नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९० * * अकोला * सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## तरुणीवर सामूहिक बलात्कार

■ वृत्तसंस्था, कानपूर, दि. ११ :
उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये तंत्रमंत्राच्या नावाखाली एका तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. ही घटना साजेठी पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावात घडली. एका कुटुंबाने आपल्या मुलीला तंत्रमंत्राच्या तावडीतून सोडवण्यासाठी एका तांत्रिकाची मदत घेतली. तांत्रिकाने तरुणीच्या नातेवाईकासह तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पीडित तरुणी सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्याच गावातील एका तरुणासोबत घरातून निघून गेली होती. सुमारे एक आठवड्यापूर्वी ती परत आली तेव्हा तिने तिच्या कुटुंबाला सांगितले की ती तरुणाने केलेल्या तांत्रिक विधींच्या प्रभावाखाली आहे.

## थोडक्यात..

### प्रजासत्ताक दिनापूर्वी जम्मूत सॅटेलाइट फोन ट्रेस

■ श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरच्या कानाचक भागात संशयास्पद सॅटेलाईट फोन संपर्क सापडला आहे. लष्कराने आंतरराष्ट्रीय सीमेवर शोध मोहीम सुरू केली आहे. सॅटेलाईट फोनद्वारे दहशतवाद्यांचे संभाषण ट्रॅक केल्याने महत्त्वाची माहिती समोर आली आहे. हा परिसर आंतरराष्ट्रीय सीमेपासून फक्त एक किलोमीटर अंतरावर आहे. अडवल्यानंतर लगेचच सुरक्षा दलांनी कारवाई केली आणि शोध मोहीम सुरू केली. प्रत्येक कोपऱ्यावर सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की संशयित दहशतवाद्यांनी थुराया उपग्रह उपकरणांचा वापर करून केलेले संपर्क सापडले, ज्यामुळे जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या विशेष ऑपरेशन्स ग्रुप, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि लष्कराने संयुक्त शोध मोहीम हाती घेतली. जम्मूच्या बाहेरील भागात असलेले कनाचक हे आंतरराष्ट्रीय सीमेपासून फक्त एक किलोमीटर अंतरावर आहे.

### आठवीपर्यंतच्या सर्व शाळा १५ जानेवारीपर्यंत बंद

■ लखनौ : देशाच्या जवळजवळ सर्व भागात थंडीचा कडाका वाढला आहे. सततच्या थंडी आणि दाट धुक्यामुळे उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगरमधील नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या सर्व शाळांना १५ जानेवारीपर्यंत सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जारी केलेल्या आदेशानुसार, दाट धुके आणि थंडीच्या लाटेमुळे, सर्व मंडळांच्या नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या शाळा १५ जानेवारीपर्यंत बंद राहतील. येथील जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या सूचनांचे पालन करून, दाट धुके आणि अति थंडी लक्षात घेता, सर्व मंडळांशी (सीबीएसई/आयसीएसई/आयबी, यूपी बोर्ड आणि इतर) संलग्न असलेल्या सर्व शाळा (नर्सरी ते इयत्ता ८ वी) १५ जानेवारी २०२६ पर्यंत बंद राहतील.

# मुंबई झोपडपट्टी मुक्त करणार

## महापालिकेसाठी महायुतीचा वचननामा जाहीर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
मुंबई महापालिकेसाठी महायुतीकडून वचननामा जाहीर करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच भाजप व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी मुंबईमधल्या मराठी माणसांसाठी तसेच येथील गिरणी कामगारांसाठी हक्काचे घर तयार करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच लाडक्या बहिणींना बेस्ट बसच्या तिकीटात ५० टक्के सूट देण्याचे आश्वासन महायुतीच्या वचननाम्यातून देण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईत असलेल्या मराठी माणसाच्या हिताचे आणि मराठी भाषेचे रक्षण करणे आणि वाढवणे ही आमची जबाबदारी आहे आणि आमचे वचन देखील आहे. तसेच मुंबईच्या बाहेर गेलेला मराठी माणूस हा मुंबईच्या बाहेर गेला, याला जबाबदार कोण? मुंबईत मराठी माणसाला परत आणण्याची देखील आमची जबाबदारी आहे.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. २० हजार इमारतींना ओसी देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून याची अंमलबजावणी पुढील एक वर्षात केली जाईल. झोपडपट्टी मुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न होते. ४० लाख लोकांना घर देणे. परंतु, मागच्या अनेक वर्षात काहीच झाले नाही. वारसा सांगणाऱ्यांची ती जबाबदारी होती. परंतु आता आम्ही ते पूर्ण करणार आहोत. सुनियोजित मुंबईचा विकास करण्याचे आमची जबाबदारी असून ती आम्ही या वचननाम्यातून करणार आहोत. गिरणी कामगारांना हक्काचे घर देण्याचे आम्ही काम सुरू केले आहे. आतापर्यंत १२ हजार लोकांना घरे दिली आहेत. देशाच्या पंतप्रधानानांनी देखील घोषणा केली आहे की सर्वांसाठी घरे यानुसार आम्ही काम करत आहोत. मुंबईतला माणूस हा बाहेर जाऊ नये आणि बाहेर गेलेला पुन्हा यावा, यासाठी आमचे प्रयत्न आहेत.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाईल, अशी टीका विरोधक आमच्यावर करत असतात. पण पंतप्रधान मोदींनी मुंबईला फार महत्त्व दिले आहे. मुंबईला फीनटेक सीटी करण्याचा निर्धार आमचा आहे. बीकेसीला इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर, स्टार्टअप हब उभारले जाणार आहेत. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचे जन्मशताब्दी वर्ष असून महापालिकेच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम राबवणार आहोत. हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ महापालिकेच्या रुग्णालयांना संलग्न करण्याचा आमचा मानस आहे. बेस्ट बसच्या तिकीटात लाडक्या बहिणींना ५० टक्के सवलत, लघु उद्योजकांना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, कोळीवाडा आणि गावठाण यांचे स्वतंत्र डीसीआर तयार करून पुनर्विकास, पुनर्विकास प्रकल्प राबवताना जी काही अडथळे येत होती, सगळे अडथळे आम्ही दूर केले आहेत. पाणीपट्टीत दरवर्षी ८ टक्के वाढ होते, पण ही वाढ पुढील ५ वर्षांसाठी स्थगित केली आहे. प्रदूषणमुक्त मुंबई करण्यासाठी १७ हजार कोटी रुपये खर्च करून पर्यावरण संवर्धन करणे, प्रदूषित पाणी समुद्रात सोडणे बंद केले जाणार. मुंबई खड्डेमुक्त करणार, असे आश्वासन शिंदेंनी दिले आहे.

### महायुतीच्या वचननाम्यातील मुद्दे

* मुंबईला पाणीपुरवठा पुढील ५ वर्षात गारगाई, पिंजाळ, दमणगंगा प्रकल्प पूर्ण करणार
* पर्यावरण संवर्धन योजनेमार्फत १७ हजार कोटी रुपये
* बीएमसी मार्केटमध्ये मासळी विक्रेत्यांसाठी कोल्ड स्टोरेज उभारणार
* सर्व भाजी मंडईचे नुतनीकरण आणि पुर्नविकास करणार
* फिश इम्पोर्ट आणि एक्सपोर्ट सेंटर स्थापन करण्यात येणार
* लघु उद्योग धोरण राबवले जाणार
* पुर्नविकासाला जलदगती देणार, पागडीमुक्त मुंबई आणि फनेल झोनप्रश्नी योजना राबवणार
* बेस्टमध्ये २०२९ पर्यंत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसेस
* बेस्टमध्ये महिलांना ५० टक्के सवलत
* बेस्ट बसेसची संख्या ५ हजारवरुन १० हजारांवर जाणार
* स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरची उभारणी करणार
* लाडक्या बहिणींना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज
* रोहिंग्या व बांगलादेशी मुक्त मुंबई करणार
* पालिकेत मराठी भाषा विभागाची स्थापना करणार
* मराठी कला केंद्र आणि अभ्यासिकेची उभारणी करणार
* बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्ताने मराठी तरुणांसाठी विशेष कार्यक्रम

# भाजपाने मुंबई, महाराष्ट्र आणि देश विकायला काढला



## राज ठाकरेंचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईच्या राजकीय इतिहासात आज सुवर्णक्षरांची नोंद होणार आहे. दादर येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची संयुक्त विराट जाहीर सभा झाली.

राज ठाकरे म्हणाले, मुंबई छत्रपती आंतरराष्ट्रीय विमानतळावरील डोमेस्टीक आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे नवी मुंबईला नेणार. ही प्रोसेस हळूहळू सुरू झालेली आहे. पुढे धारावी लागून असलेले मुंबईचे संपूर्ण विमानतळ विकायला काढणार. शिवाजी पार्क मैदानाएवढी ५० ते ६० पार्क तिथे बसतील, एवढा प्लॉट आहे तो. स्वकियांचा घात करणारी औलाद ही फक्त पक्षांमध्ये नसते. राजकीय पक्षांमध्ये आल्याचे मला कळलंय. सत्ता डोक्यात गेलीये. हा भूगोल नीट समजून घ्या. वाढवण बंदाराला लागून लगेच गुजरात आहे. मुंबई गुजरातला न्यायची यांच्या पहिल्यापासून डोक्यात आहे. मुंबई गुजरातला नेण्यासाठी पालघर जिल्हा ताब्यात घ्यावा लागेल, ठाणे जिल्ह्याचा भाग, एमएमआर रिजनचा भाग ताब्यात घ्यावा लागेल. तर मुंबईपर्यंत पोहोचता येईल. पैसे बदाबद टाका, मतदारसंघ फोडा, मराठी माणसांना फोडा, मतदारसंघ ताब्यात घ्या आणि नंतर सांगा खासदार, आमदार, नगरसेवक आमचाच. महापालिका आमच्याच ताब्यात.

तुळजापूरमध्ये ड्रग्ज रॅकेटमधील माणसाला तिकीट दिले. तुमच्या नाकावर टिच्चून ते तिकीट दिले. बदलापूर बलात्काराच्या केसमधील आरोप तुषार आपटेला नगरसेवक केले. लहान मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप असलेला माणूस नगरसेवक. एवढी हिंमत कुठून आली? ज्यावेळेला वेड्यावाकड्या पद्धतीने निवडणुका जिंकण्याचे यंत्र किंवा तंत्र हस्तगत होते, हा माज त्यातून येतो. मुंबई, महाराष्ट्र, देश विकायला काढलाय. आपल्यासमोर काय वाढून ठेवले याचा अंदाजही नाहीये.

# ज्या संस्कृती इतरांना नष्ट करून वाढू पाहतात त्या स्वतःच नष्ट होतात : पंतप्रधान



■ वृत्तसंस्था, सोमनाथ, दि. ११
पंतप्रधान मोदी आज (रविवार) सोमनाथला भेट देत आहेत. त्यांनी येथील शौर्य यात्रेत भाग घेतला. या दरम्यान त्यांनी सोमनाथ मंदिरात प्रार्थना केली आणि मंदिराच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान मोदी म्हणाले, "सोमनाथ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून मला सोमनाथ स्वाभिमान पर्वात सक्रियपणे सहभागी होण्याची संधी मिळाली हे मी एक मोठे सौभाग्य मानतो. आज देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो लोक आमच्यात सामील झाले आहेत; त्या सर्वांना जय सोमनाथ."

हा काळ अद्भुत आहे, हे वातावरण अद्भुत आहे, हा उत्सव अद्भुत आहे. एकीकडे भगवान महादेव, दुसरीकडे, समुद्राच्या लाटा, सूर्याची किरणे, मंत्रांचा प्रतिध्वनी, श्रद्धेचा हा लाट आणि या दिव्य वातावरणात भगवान सोमनाथच्या भक्तांची उपस्थिती या प्रसंगाला भव्य आणि दिव्य बनवते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "कल्पना करा की सुमारे १,००० वर्षांपूर्वी याच ठिकाणी वातावरण कसे असेल." तेव्हा आपल्या पूर्वजांनी आपले प्राण धोक्यात घातले होते. आपल्या पूर्वजांनी सर्वस्व अर्पण केले. सोमनाथ स्वाभिमान यात्रा जगभरातील भाविकांसाठी व्हावी अशी माझी इच्छा आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "७२ तास सतत ओंकाराचा आवाज, ७२ तास सतत मंत्रांचा जप. मी काल रात्री १,००० ड्रोनसह ते पाहिले, वैदिक गुरुकुलातील १,००० विद्यार्थ्यांची उपस्थिती, सोमनाथच्या १,००० वर्षांच्या गाथेचे प्रदर्शन. आणि आज, १०८ घोड्यांसह मंदिराची शौर्य यात्रा, मंत्र आणि स्तोत्रांचे अद्भुत सादरीकरण, सर्वकाही मंत्रमुग्ध करणारे आहे. ही भावना शब्दात व्यक्त करता येत नाही; फक्त वेळच ती पकडू शकते."

ते म्हणाले, "हजार वर्षांपूर्वी या ठिकाणी वातावरण कसे असेल?" तुमच्यापैकी जे येथे उपस्थित आहेत त्यांच्या पूर्वजांनी, आमच्या पूर्वजांनी, आपले जीवन धोक्यात घातले. त्यांनी त्यांच्या श्रद्धेसाठी, त्यांच्या महादेवासाठी सर्वस्व अर्पण केले. हजार वर्षांपूर्वी, त्या अत्याचारी लोकांना वाटले की त्यांनी आपल्यावर विजय मिळवला आहे, परंतु आज, हजार वर्षांनंतरही, सोमनाथ महादेव मंदिरावर फडकणारा ध्वज संपूर्ण विश्वाला भारताच्या शक्ती आणि सामर्थ्याबद्दल हाक मारत आहे.

# 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता लांबणीवर पडणार?



निवडणूक आयोगाने सांगितल्यास १६ तारखेला पैसे देणार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात संघर्षाचा केंद्रबिंदू ठरली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मकर संक्रांतीपूर्वी डिसेंबर आणि जानेवारीचे एकत्रित ३००० रुपये बहिणींच्या खात्यात जमा करण्याच्या हालचाली सत्ताधाऱ्यांनी सुरू केल्या होत्या. मात्र, काँग्रेसने यावर आक्षेप घेत निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, १४ जानेवारीनंतरच हे पैसे देण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. "जर निवडणूक आयोगाने सांगितले, तर आम्ही लाडकी बहीण योजनेचा हप्ता १६ जानेवारीला देऊ," असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीला विधानसभा निवडणुकीत सत्तेत येण्यासाठी गेमचेंजर ठरलेली ही योजना आता महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचे मुख्य हत्यार बनली आहे. भाजप नेते गिरीश महाजन आणि मुंबईतील उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दोन महिन्यांचे हप्ते एकत्र देण्याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर केल्या.

# जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील ५० टक्केच्या आत आरक्षण असलेल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा करण्याच्या तयारीत राज्य निवडणूक आयोग असतानाच जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल झाली असून त्यावर सोमवारी सरन्यायाधिश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणुका ३१ जानेवारी पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले आहेत. ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर सुरुवातीस सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५० टक्के आरक्षण मर्यादेतच घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.

मात्र कालांतराने ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाले असतानाही नगरपालिका, नगरपंचायती आणि नागपूर, चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुका न्यायलयीन अंतिम निर्णयाच्या अधिन राहून घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले मात्र याच आदेशात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या बाबतीत केवळ ५० टक्के आरक्षणाची मयार्दा पाळणाऱ्याच जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या टप्यात २८८ नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणूका पूर्ण केल्या असून टप्यात २९ महापालिकांच्या निवडणुका येत्या १५ जानेवारी रोजी होणार आहेत. तसेच ५० टक्के आरक्षणाची मयार्दा पाळणाऱ्या लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची आणि त्याचा निवडणूक कार्यक्रम पुढील आठवड्यात घोषित करण्याची तयारी आयोगाने केली होती.

पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्हयातील जिल्हा परिषदांच्या निवडणुका होत असताना ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास आयोगाने असमर्थता दाखविली होती.

यातील बहुतांश जिल्हा परिषदा विदर्भ आणि मराठवाड्यातील असल्याने तेथील आरक्षणाचा गुंता सुटल्याशिवाय निवडणुका घेता येणार नाहीत अशी भूमिका आयोगाने घेतली होती. नगरपालिका, महापालिका प्रमाणेच ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन निर्णयास अधिन राहून घ्याव्यात अशी मागणी या याचिकेत करण्यात आली असून त्यावर सोमवारी मुख्य न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

# बेटी बचाव बेटी पढाव नाही भाजपापासून बेटी बचाव



■ वृत्तसंस्था, पनवेल, दि. ११
भारतीय जनता पक्ष स्वतःला पार्टी विथ डिफरन्स म्हणते पण ते वस्तुस्थिती तशी नाही. भाजपात गुंड, मवाली, माफिया यांना आमदार, खासदार, मंत्री केले जाते, आता तर भाजपा बलात्काऱ्यांनाही पक्षात संधी देत आहे. बदलापूरमध्ये लहान मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला भाजपाने स्विकृत नगरसेवक करून विकृतीचा कळस गाठला आहे, असा घणाघाती हल्लाबोल करत भाजपाचा बेटी बचाव, बेटी पढाव, हा पोकळ नारा असून खरे तर भाजपापासून बेटी बचाव असे चित्र आहे असे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना रविवारी पनवेल मध्ये प्रचार केला. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, उन्नाव बलात्कारातील आरोपी भाजपचा आमदार आहे, उत्तराखंड मधील अंकिता भंडारी प्रकरणातही भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची नावे समोर आली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव केलेल्या महिला खेळाडूंचे लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणात भाजपाच्या खासदाराचे नाव आलेले आहे आणि आता लहान मुलींवर लैंगिक अत्याचार केलेल्या नराधमाला भाजपाने स्विकृत नगरसेवक पदी नियुक्त केले. भाजपाने सर्व मयार्दा, नैतिकता गुंडाळून ठेवली आहे.

भारतीय जनता पक्ष व एकनाथ शिंदे यांची शिवसेना सत्तेसाठी कोणाशीही युती करत आहे. अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी पक्षातील कोणालाही न विचारता भाजपाला पाठिंबा दिला हे समजताच त्यांना काँग्रेसने तात्काळ बडतर्फ केले. पण भाजपाने मात्र त्यांना त्यांच्या पक्षात घेतले. अकोटमध्ये ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाशी युती केली तर शिंदेसेनेनेही एमआयएमशी युती केली. प्रचार मात्र खान महापौर होईल, खान हवा का बाण हवा, असे सांगून धार्मिक तेढ निर्माण करायची आणि सत्तेसाठी मात्र ओवैसींच्या पक्षाशी हातमिळवणी करायची, एवढ्या खालच्या स्तराला भाजपाचे राजकारण गेले आहे.

# भारताचा न्यूझिलंडवर ४ गडी राखून विजय



कोहलीच्या ९३ धावा, कर्णधार गिलचे अर्धशतक

■ वृत्तसंस्था, स्पोर्ट्स डेस्क, दि. ११
भारताने एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना १४ जानेवारी रोजी राजकोट येथे खेळला जाईल.

रविवारी, भारताने वडोदराच्या कोटाम्बी स्टेडियमवर नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने ५० षटकांत ८ विकेट्सच्या मोबदल्यात ३०० धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने ४९ षटकांत ६ विकेट्स गमावून विजय मिळवला. केएल राहुलने ख्रिश्चन क्लार्कच्या चेंडूवर षटकार मारत विजय निश्चित केला.

कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. त्याने २६ वी धाव करत हा टप्पा गाठला आहे. सचिन तेंडुलकर (३४३५७ धावा) यांच्याकडे सर्वाधिक धावा आहेत. श्रीलंकेचा कुमार संगकारा (२८०१६ धावा) दुसऱ्या स्थानावर आहे. या डावातील दुसऱ्या षटकारासह रोहित एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा सलामीवीर ठरला. त्याने वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलचा ३२८ षटकारांचा विक्रम मोडला. रोहितकडे आता १९३ एकदिवसीय सामन्यात सलामीवीर म्हणून ३२९ षटकार आहेत. सर्व फलंदाजी स्थाने एकत्रित करून, रोहित शर्माच्या नावे एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम आधीच आहे. त्याच्या नावावर ३५७ षटकार आहेत.

न्यूझीलंडच्या तीन फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. डॅरिल मिशेलने ७१ चेंडूत ८४ धावा केल्या. हेन्री निकोल्सने ६२ आणि डेव्हॉन कॉनवेने ५६ धावा केल्या. भारताकडून मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. कुलदीप यादवने एक बळी घेतला.

## शिवसेना ठाकरे गटाच्या निष्ठावंत दगडू सकपाळ शिंदे गटात

# दादांचे नेतृत्व दगडासारखे मजबूत : एकनाथ शिंदे



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. म्हातारा झाल्यावर माणसाची गरज संपते, असे निराशाजनक विधान सकपाळ यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर त्यांनी आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी दगडू सकपाळ यांनी त्यांच्या मुलीला, रेश्मा सकपाळ यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडे केली होती. मात्र, त्यांच्या पदरी निराशा पडली. त्यानंतर सकपाळ नाराज झाले होते. लालबाग, परळ तसेच शिवडी परिसरात त्यांनी शिवसेनेचे मोठे वर्चस्व निर्माण केले होते. परंतु, पदरी निराशा पडल्याने त्यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला रामराम ठोकला आणि शिंदे गटात प्रवेश केला आहे.

आपले संपूर्ण कुटुंब शिवसेनेत (ठाकरे गट) कार्यरत आहे. अनेक आंदोलनांमध्ये सक्रिय सहभागी झाल्यानंतर आपल्यावर गुन्हे दाखल झाले. पक्षासाठी झोकून काम केले. गेल्या १५ वर्षांमध्ये पक्षाकडे आपण काहीच मागितले नाही. आपल्या हयातीत मुलगी नगरसेविका व्हावी अशी इच्छा होती. त्यामुळे मुलीला उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु पदरी निराशा आली. शिवसेनेनेच मला मोठे केले. पण इतकी वर्षे सक्रिय सहभागानंतर पक्षाने आपल्याला दणका दिला, अशी खंत दगडू सकपाळ यांनी बोलून दाखवली.

दगडू सकपाळ यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दगडू सकपाळ यांनी शिवसेना वाढवण्यासाठी अपार कष्ट घेतले. दगडू दादांच्या प्रवेशामुळे खऱ्या अर्थाने लालबाग राजाचा आशीर्वाद शिवसेनेला मिळाला आहे. दगडू दादांचे नेतृत्व बघितले तर दगडासारखे कणखर आणि मजबूत आहे. दगडू दादा हे मुंबईतल्या शिवसेनेच्या पायाचा दगड आहे. पाया मजबूत असेल तर इमारत मजबूत होते.

# शहरातील दुचाकी वाहन चालकांना नायलॉन मांजामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी लोखंडी रॉडचे वाटप

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. अर्चित चांडक साहेब यांचे संकल्पनेतुन आज दि. ११/०१/२०२६ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालय समोर अकोला शहरातील नायलॉन ( चायनिज) मांजा मुळे होणारे दुखापती किंवा अपघातसा आळा घालण्याकरीता दुचाकी वाहन चालाकांचे वाहनांवर २०० लोखंडी आर्च तयार करून शहर वाहतुक नियंत्रण शाखा तर्फे लावण्यात आले.नायलॉन (चायनिज) मांजा वापरामुळे मानवी जिवीतास गंभीर धोका निर्माण होत आहे. नायलॉन मांजा हा अत्यंत धारदार असुन दुचाकी स्वार, पादचारी यांचे गळे, चेहरा व हात कापले जाण्याचे अपघात घडत आहेत. तसेच हा मांजा पर्यावरणास घातक आहे. तसेच शासन आदेशानुसार नायलॉन / चायनीज मांज्याची निर्मीती, विक्री, साठवणुक व वापर पुर्णत: प्रतिबंधीत करण्यात आलेली आहे. सदर आदेशाचे उल्लंघन करणा-या व्यक्तीस / व्यापा-याविरूध्द प्रचलीत कायदयानुसार गुन्हा दाखल करून दंडची कार्यावाही करण्यात येईल.शहर वाहतुक नियंत्रण शाखा तर्फे पुढील ०७ दिवस दुचाकी वाहनांवर सेफटी लोखंडी आर्च लावण्याची मोहीम सुरू राहणार आहे. नायलॉन मांजा साठवणुक व वापर करणा-या विरूध्द माहिती



असल्यास पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. ०७२४-२४४५३३३, २४३५५००, किंवा संबंधीत पोलीस स्टेशनला माहिती दयावी. तरी नागरिकांनी पतंग उडवितांना नायलॉन मांजाचा वापर करू नये याबाबत सर्व जनतेस अकोला जिल्हा पोलीस दला तर्फे आवाहन करण्यात येत आहे.

## अपघातात शेतकरी पुत्र जागीच ठार



■हिवरखेड,दि.११ (प्रतिनिधी)■ तेल्हारा मार्गावरील गोरधा फाट्या जवळ कारने हिंगणी येथील शेतकरी पुत्र मोटारसायलने जात असता त्याला जबर धडक दिली. या घटनेत युवक जागीच ठार झाला. मृतक अश्विन कोरडे हिंगणी येथील असल्याची माहिती आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी कार ताब्यात घेतली. अपघातात युवक मरण पावल्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. आरोपी चालकाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली. तसेच या भागातील वाढत्या अपघातांना आळा घालण्याची मागणी केली. पोलिसांनी पंचनामा केला. हिवरखेड पोलिस तपास करीत आहेत.

# पातुर वाशिम महामार्गावर चालत्या वाहनाला आग

पातूर : जानेवारी रोजी सायंकाळी ७.१५ वाजता मालेगावहून पातूरकडे येत असलेल्या टाटा सुत्रो (क्रमांक एमएच २६ बीसी ३९३७) या चालत्या वाहनाला बोडखा परिसरात अचानक आग लागली. प्राप्त माहितीनुसार, या वाहनात चालकासह चार जण प्रवास करतहोते व ते मालेगावहून पातूरकडे जात होते.वाहनचालक अंकुश बलराम नावकार यांच्या माहितीनुसार, गाडीमध्ये अचानक उष्णता जाणवू लागली आणि क्षणातच वाहनातून धूर निघू लागला. प्रसंगावधान राखत त्यांनी तात्काळ वाहन थांबवले आणि सर्व प्रवासी सुखरूपपणे गाडीतून बाहेर पडले.काही वेळातच वाहनाला भीषण आग लागली. सुदैवाने या घटनेर कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र वाहन पूर्णपणे जळून खाव झाले. घटनेची माहिती मिळतार अग्निशमन विभागाचे सैयतब अशफाक व प्रल्हाद वानखेड अग्निशमन वाहनासह घटनास्थळ दाखल झाले, स्थानिक नागरिव दुलेखा यांच्या मदतीने आगीव नियंत्रण मिळवण्यात आले. यावेळ पातूर पोलीस ठाण्याचे हिम्मत रा दिघोळे व इस्माईल मल्ला यांनीह घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण घटनेची माहिती घेतली. रात्रीच्य अंधारात आगीने उग्र रुप धारण केल्यामुळे आग आटोक्या आणणे अशक्य होते. तरीही प्रयत्न करुन आग नियंत्रणात आणण्याच प्रत्यत्न झाला. परंतु तो



अयशस्व ठरला.

## निषेध



**काँग्रेस ,शिवसेना उबाठा,राष्ट्रवादी श.प महाविकास आघाडी ने लाडकी बहीण योजनेचे पैसे या महिन्यात खात्यामध्ये टाकू नये असे निवेदन दिले आहे यांचा निषेध म्हणून महा आघाडीने दिलेल्या निवेदनाची होळी अकोट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अकोट शहर भाजपा शहराध्यक्ष हरीश टावरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली यावेळी मोठ्या संख्येने आजी माजी नगरसेवकासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## गोजिरी जिजाऊ



स्वप्न उराशी मोठे बाळगू,
जिजाऊंसारखे धीर धरू.
अन्यायाविरुद्ध उभे राहू,
अन नीतीचा मार्ग धरू.
हाती नको केवळ खेळणी,
हाती घेऊ ज्ञानाची लेखणी.
बुद्धी आणि बळाचा मेळ,
हाच आयुष्याचा खरा खेळ.
संकटांना पाहून नको घाबरायला,
शिका जिद्दीने पुढे पाऊल टाकायला.
आई जिजाऊंचा वारसा जपू,
स्वप्न आपले सत्यात उतरवू.

**श्रीमती संज्योती चंदन**
अकोला

## अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर
# शहरातील विविध शाळांमधून मतदार जनजागृती

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने दि. १० जानेवारी २०२६ रोजी या उपक्रमांतर्गत माँ शारदा देवी कॉन्व्हेंट, गीता नगर, मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक २२, कृषी नगर तसेच न्यू इंग्लिश हायस्कूल, अकोला येथे इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



एल. आर. टी. कॉलेजचे माजी प्राचार्य सत्यनारायणजी बाहेती यांच्या पुढाकाराने माँ शारदा देवी कॉन्व्हेंट येथे मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला.

यावेळी शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी (मतदार जनजागृती अभियान) हरिश्चंद्र इटकर, सत्यनारायणजी बाहेती, संजय खराटे व सुशीला सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका तसेच मतदान प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

# धनादेश अनादरीत प्रकरणात आरोपीला १६,००,०००/-फिर्यादीला देणेबाबतचा दंड

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

फिर्यादी रमेश तुकाराम सावरकर हे शासकीय नोकरीत होते व ते निवृत्त झाल्यानंतर त्यांना सेवानिवृत्तीची रक्कम मिळाली होती. आरोपी हा त्यांचा चांगला ओळखीचा होता. आरोपी मित्र गजानन उर्फ बबलु देविदास उके ( रा. भारती प्लॉट जूने शहर अकोला) याला वॉटर प्लांट टाकायचा असल्या कारणाने आरोपीने हात उसणे म्हणुन रू ८,००,०००/- घेतले होते व रक्कम घेतेवेळी सदर रक्कम परत देण्याचा विश्वास व हमी दिली होती. फिर्यादी रमेश तुकाराम सावरकर यांनी सदर रक्कम आरोपीला परत मागितली असता आरोपीने फिर्यादी यांना रु ८,००,०००/- चा धनादेश दिला होता. सदर धनादेश फिर्यादी रमेश तुकाराम सावरकर यांनी त्याचे बँक खात्यात लावला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी शिल्लक नाही या शे-यासह परत आला. सदरहू बाब फिर्यादी यांनी आरोपी गजानन उर्फ बबलु देविदास उके यांना सांगितली. परंतु आरोपी यांनी याबाबत फिर्यादीला कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही व त्या कारणाने फिर्यादी रमेश तुकाराम सावरकर यांनी आरोपीला वकीलामार्फत नोटीस पाठविली व आरोपी विरूध्द कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेट अक्ट अंतर्गत कोर्टात प्रकरण दाखल केले. सदर प्रकरणात पुर्ण दस्ताने अवलोकन करून आरोपी विरूध्द वि. ९ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, अकोला यांनी दि. ०३.०१.२०२६ रोजी आरोपीला दोषी ठरवत फिर्यादी रमेश तुकाराम सावरकर यांना आरोपीने रू.१६,००,०००/- दंडापोटी देवुन एका महीन्याची कारावासाची शिक्षा सुनावली तसेच दंड न भरल्यास एक महिन्याचा आतिरीक्त कारावास आहे. फिर्यादीतर्फे अड मो. परवेज दोकाडीया, अड. आफरीन एम. ए. कुद्दस व अड निदा खान यानी फिर्यादी तर्फे काम पाहीले.

## थोडक्यात

### नायलॉन मांजा विकणाऱ्यां तीन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

**मूर्तिजापूर** : मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरात जीवघेण्या नायलॉन आणि चायनीज मांजाची विक्री करणाऱ्यांविरुद्ध मूर्तीजापूर शहर पोलिसांनी कडक पाऊले उचलली आहेत. 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत शहरात ठिकठिकाणी छापे टाकून पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले असून, त्यांच्याकडील प्रतिबंधित मांजा जप्त केला आहे. उच्च न्यायालयाच्या प्रतिबंधात्मक आदेशाची कडक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. नायलॉन मांजामुळे होणारे अपघात आणि पक्ष्यांची होणारी हानी टाळण्यासाठी पोलिसांनी शहरात पाळत ठेवली होती. या कारवाईत पोलिसांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२५, १२३, २९६ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ४, ५ आणि १५ अन्वये गुन्हे नोंदवले आहेत. या प्रकरणातील गुन्हे क्रमांक ०५/२६, १४ / २६ आणि १५ / २६ असे असून, पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे मांजा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. पतंगोत्सवाचा आनंद घेताना नागरिकांनी केवळ सुती धागा किंवा सुरक्षित मांजाचाच वापर करावा, नायलॉन मांजाचा वापर, साठवणूक किंवा विक्री करताना आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली

# ६४ संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्हीचा वॉच

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

निवडणूक जवळ येताच राजकीय वातावरण चांगलेच तापले असून प्रचाराने वेग घेतला आहे. येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने सर्वच उमेदवारांनी आपली ताकद पणाला लावली आहे. शहरातील २० वॉर्डीम धील ८० जागांसाठी एकूण ४६९ उमेदवार रिंगणात असून, त्यापैकी ३६७ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आहेत. उमेदवारांची ही मोठी संख्या पाहता काही वॉर्डात काट्याची टक्कर होणार असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील केंद्रांचे मूल्यांकन केले असून, शहरातील ६४ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर राहणार



आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत सर्वच राजकीय पक्षांच्या आणि अपक्ष उमेदवारांनी कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत पदयात्रा, कोपरा सभा, घरोघरी जाऊन प्रत्यक्ष गाठीभेटी, भव्य वाहन रॅली आणि सोशल मीडियाच्या माध्य मातून मतदारांशी थेट संवाद साधला जात आहे.

# लाडक्या बहिनींच्या मानधनाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा व ऊबाठाचा महानगरमध्ये भाजपा निषेध करणार

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

लाडक्या बहिणीच्या खात्यामध्ये संक्रांत च्या पूर्वी टाकू नका असा पत्र निवडणूक आयोगाला काँग्रेसने देऊन महिलांच्या महत्त्वाच्या सणाला विरोध केला आहे तसेच उभाटा सेनेचा सुद्धा याला विरोध आहे याचा जाहीर निषेध करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने अकोला शहरांमध्ये ८० ठिकाणी मातृशक्तीला सोबत घेऊन या प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अर्थमंत्री नामदार दादा पवार यांनी लाडक्या



बहिणींच्या खात्यामध्ये हिंदू सणातील महत्त्वाचा मकर संक्रांत हा उत्सव देशभरात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो आणि हळदीकुंकू आणि संस्कृतीचा संवर्धनाचं काम असणारा या कार्यक्रमाला महिलांच्या खात्यामध्ये दोन महिन्याची रक्कम देण्याचा निर्णय निवडणूक घोषणा होण्याच्या आधी झाली होती आणि त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते त्या नियोजनाला विरोध करण्याचा निर्णय पत्र काँग्रेसच्या वतीने देण्यात आले असून याचा जाहीर निषेध अकोला नगरातील ८० ठिकाणी मातृशक्तीला सोबत घेऊन भारतीय जनता पक्षाने जाहीर निषेध आज दिनांक ११ जानेवारी रोजी ठीक पाच वाजता वेगवेगळ्या ठिकाणी करून लाडक्या बहिणीच्या हक्कावर विरोध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्यात येणार आहे.

# खडकी येथे आज जिजाऊ-विवेकानंद जयंती उत्साहाचे आयोजन

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

जगाला वैचारिक तेज देणारे, युवाशक्तीला आत्मविश्वासाचे बळ देणारे महायोगी स्वामी विवेकानंद आणि स्वराज्य संकल्पनेची आद्य प्रेरणा, छत्रपती शिवरायांच्या संस्कारांची जननी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त समाजघडणीस वाहिलेल्या कार्याचा सन्मान करणारा भव्य व प्रेरणादायी पुरस्कार वितरण सोहळा - २०२६ सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ रोजी खडकी अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे.विचार, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा त्रिवेणी संगम असलेल्या या सोहळ्याचे आयोजन अखिल भारतीय मराठा सेवा संघ , डी. एम. के .सेवा मंडळ, निर्भय बनो जनआंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, समाजहितासाठी निस्वार्थपणे झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा जिजाऊ, स्वामी विवेकानंद पुरस्कार देऊन यथोचित गौरव सन्मान या निमित्ताने केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धर्म, संस्कार व समाजप्रबोधनाचे दीपस्तंभ ह.भ.प. श्री वासुदेवराव महल्ले महाराज (अध्यक्ष - श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट) विराजमान राहणार आहेत.

त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे या सोहळ्याला वैचारिक अधिष्ठान लाभणार आहे.राजमाता जिजाऊ पुरस्कार माजी प्राचार्य सौ. प्रतिभा सुभाषराव पाथ्रीकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार असून, सामाजिक कार्याचा गौरव करणाऱ्या या क्षणाचे साक्षीदार होण्याची संधी उपस्थितांना मिळणार आहे.या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. वामनरावजी भिलारे (राष्ट्रीय कार्याध्यक्ष, अखिल भारतीय म राठा सेवा संघ, ),मा. हनुमंत शेळके (राज्य उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठा सेवा संघ),मा. प्रकाश पोहरे (राष्ट्रीय अध्यक्ष,



किसान ब्रिगेड),दिलीप अंधारे (माजी अध्यक्ष, साने गुरुजी शिक्षक पतसंस्था, अकोला),धनंजय मिश्रा (प्रवक्ता, किसान ब्रिगेड),दिवाकर गावंडे (जिल्हाध्यक्ष, किसान ब्रिगेड, अकोला) तसेच तात्यासाहेब मोरे (सामाजिक कार्यकर्ते, पंढरपूर) यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवणार आहे.हा भव्य सोहळा हॉटेल मैत्री, खडकी-चांदूर बायपास राज्यमहाम ार्गालगत, खडकी, अकोला येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. दादाराव पाथ्रीकर (राष्ट्रीय संघटक, अखिल भारतीय मराठा सेवा संघ) आणि श्री. गजानन हरणे राज्य उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठा सेवा संघ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार आणि राजमाता जिजाऊंचे संस्कार समाजमनात रुजवणारा हा जयंती सोहळा केवळ एक कार्यक्रम न राहता, सामाजिक जाणीव जागवणारा वैचारिक उत्सव ठरणार असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून या प्रेरणादायी सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांतर्फे प्रा.दादाराव पाथ्रीकर व समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे.

# जिजाऊ कन्या विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात



■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

अकोला एज्युकेशन सोसायटी द्वारे संचलित राम दास पेठ येथील जिजाऊ कन्या विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय योगपटू व राष्ट्रीय योग पंच सौ मनीषाताई कुलकर्णी उपस्थित होत्या तर कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी अकोला एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष विलास देशपांडे होते.

तसेच कार्यक्रमात जिजाऊ कन्या विद्यालय शाळा समितीचे अध्यक्ष प्रा.के.आर.जोशी, संस्थेचे वरिष्ठ उपाध्यक्ष विजय नानोटी,सहसचिव जितेंद्र पातुरकर,सौ. रमणी जोशी, सौ. माधुरी देशपांडे, सौ.कोलारकर समवेत अकोला एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे प्राचार्य आणि मुख्याध्यापक उपस्थित होते.लेझीमच्या गजरात क्रीडादिंडी काढून दिंडी पूजनाने या सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी मान्यवरानी आकाशात बलून सोडून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा देशपांडे यांनी करून विद्यार्थी वर्गाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला.अतिथीं परिचय श्रीमती कविता मोहोड यांनी केला.यावेळी वर्ग पाच ते दहाच्या मुलींनी संगीतमय कवायती सादर केल्यात. समता फाउंडेशनच्या वतीने शाळेला लाभलेल्या फॅशन डिझायनिंग लॅब मध्ये विद्यार्थिनींनी स्वतः शिवलेले ड्रेस घालून नृत्य आणि रॅम्प वॉक सुद्धा सादर केले. हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते.

कार्यक्रमात शाळेतील सर्व ३९० विद्यार्थिनींनी सामूहिक कवायत सादर करीत जल्लोष निर्माण केला.मान्यवरानी आपल्या भाषणात विद्यार्थिनींच्या संगीतमय कवायतींचे कौतुक केले आणि आयुष्यातील योगाचे महत्त्व विद्यार्थिनींना समजावून सांगितले.विलास देशपांडे यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणात विद्यार्थिनींचे कौतुक करीत शिस्त व आरोग्याचे महत्त्व विशद केले. यावेळी प्रमुख अतिथींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# अमरावती,नागपुर, पुणेसह १६ एक्स्प्रेस रद्द

## ५ गाड्यांच्या मार्गात बदल



■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत येणाऱ्या दौंड- मनमाड रेल्वे मार्गावरील दौंड आणि काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी प्री-नॉन इंटरलॉकिंग (प्री-एनआय) आणि नॉन इंटरलॉकिंग (एनआय) अंतर्गत विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या मेगा ट्रॅफिक ब्लॉकमुळे प्रवाशांचे मोठे हाल होणार असून, १६ महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर ५ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. यामध्ये अमरावती, नागपूर, पुणे, नांदेड आणि जळगाव मार्गावरील प्रवाशांना मोठा फटका बसणार आहे. रेल्वे मार्गाच्या नियमित देखभालीसह पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी २४ जानेवारीपासून हा ब्लॉक कार्यान्वित होईल. रद्द करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये प्रामुख्याने ११०२५ पुणे - अमरावती एक्सप्रेस (२४, २५ जानेवारी), ११०२६ अमरावती-पुणे एक्सप्रेस (२३, २४ जानेवारी), १२१२० अमरावती-पुणे एक्सप्रेस (२५ जानेवारी), १२११३ पुणे - नागपूर गरीब रथ (२४ जानेवारी), १२११४ नागपूर- पुणे गरीब रथ (२३ जानेवारी), २२१३९ पुणे-अजनी हमसफर (२४ जानेवारी) आणि २२१४० अजनी- पुणे हमसफर (२५ जानेवारी) या गाड्यांचा समावेश आहे. तसेच पुणे - नांदेड, पनवेल- नांदेड, दौंड- निजामाबाद आणि दादर-साईनगर शिर्डी या गाड्यांच्या फ ेऱ्याही रद्द करण्यात आल्या आहेत.

मार्गांत झालेला बदल : काही लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. यशवंतपूर - चंदीगड एक्सप्रेस (२४ जानेवारी) मनमाड- इगतपुरी-कल्याण-लोणावळा मार्गे वळवण्यात आली आहे. तसेच हुबळी- हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस (२४ जानेवारी) लातूर- परळी-औरंगाबाद मार्गे धावेल. जम्मूतवी- पुणे एक्सप्रेस (२३ जानेवारी), हजरत निजामुद्दीन- वास्को-द-गामा एक्सप्रेस ( २३, २४ जानेवारी) आणि पुणे - गोरखपूर एक्सप्रेस (२४ जानेवारी) या गाड्या लोणावळा- कर्जत-पनवेल-कल्याण - इगतपुरी मार्गे आपल्या नियोजित स्थळी पोहोचतील. प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळेची खातरजमा करावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहें ब्लॉकच्या कालावधीत काही गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. ट्रेन क्रमांक १२१०३ पुणे-लखनऊ एक्सप्रेस ११, १३ आणि २० जानेवारी रोजी दीड ते दोन तास उशिराने सुटेल. ट्रेन क्रमांक २२८४५ पुणे - हाटिया एक्सप्रेस १२, १८ आणि २१ जानेवारी रोजी २ तास १० मिनिटे उशिराने धावेल, तर गाडी क्रमांक ०२१३१ पुणे - जबलपूर एक्सप्रेस १९ जानेवारी रोजी १ तास ३० मिनिटे उशिराने रवाना होईल.

# बचत खात्यातून रुपये ७९,००० बेकायदेशीर रित्या विड्रॉल

## बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा याना आयोगचा दणका

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा यांनी तक्रारदार रामखिलावन अयोध्या खरेबिन, बोरगाव मंजू राहवासी यांचा खात्यातून २०१९ मध्ये अनधिकृत विड्रॉल रक्कम रुपये ७९,०००/- झाली. बचत खात्यातून रुपये ७९,०००/- बेकायदेशीर रित्या विड्रॉल झाल्याबाब दिलेला अर्ज, पासबुक व खाते उतारा, एटीएम कार्ड ची प्रत, रजिस्टर नोटीस,पोलीस स्टेशन येथे दिलेली तक्रार व भारतीय रिझर्व बँक यांना सदर बाबतीत दिलेला अर्ज सदर दस्ताना आयोगाने ग्राह्य धरले.

न्यायालयात सुनावणीदरम्यान तक्रारदारतर्फे ॲड.विशाल टिबडेवाल यांनी प्रभावीपणे बाजू मांडत ठोस पुरावे सादर केले. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आयोगाने तक्रारदारचा दावा ग्राह्य धरला.

तसेच तक्रारदार यांनी कशाप्रकारे निष्काळजीपणा केला व तक्रारदार सदर फ्रॉड साठी कसा जबाबदार आहे याबाबत कोणतेही पुरावे अभिलेखावर सादर केले नाहीत. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा यांनी, तक्रारदार यांच्या तक्रारीबाबत काय चौकशी किंवा कार्यवाही केली याबाबतही कोणतेही पुरावे अभिलेखावर सादर केले नाहीत. बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा यांनी तक्रारदार यांना सदर प्रकरणात योग्य ती सेवा पुरविली नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते.

तक्रारदार यांनी युक्तीवादा दरम्यान भारतीय रिझर्व बँकेचे परिपत्रक अभिलेखावर,उच्च न्यायालय मुंबईचे आदेश,राष्ट्रीय आयोग चे आदेश सादर करुण त्यामध्ये, अनधिकृत विड्रॉल झालेलीसाठी बँकला ग्राहकाचा नुकसान भरपाईसाठी जबाबदार ठरविले आहे. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात आले.

बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा याना तक्रारदार त्यांचे खात्यातून अनधिकृत विड्रॉल झालेली रक्कम रुपये, ७९,०००/- तक्रार दाखल दिनांक ३०/१२/२०१९ पासून प्रत्यक्षात आदायेगी पर्यंत द.सा. द.शे.६% व्याजाने द्यावी .तसेच बँक ऑफ महाराष्ट्र बोरगाव मंजू शाखा यांनी तक्रारदार यांना शारीरिक, मानसिक त्रासापोटी रुपये ३,०००/- द्यावे. तसेच प्रकरण खर्चापोटी रुपये २,०००/-द्यावे असा आदेश दिनायत आले.

# मूर्तिजापूर पोलिसांचे 'जीवन सुरक्षा'साठी ठोस पाऊल

**मूर्तिजापूर :** मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरात चायनीज मांजामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी मुर्तिजापूर पोलिसांनी कंबर कसली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून शहरात 'सडक सुरक्षा जीवन सुरक्षा' हे विशेष अभियान राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत दुचाकीस्वारांच्या सुरक्षेसाठी वाहनांना सेफ्टी आर्च बसवून देण्यात आले आहेत.शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजित जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबवण्यात आले. राज्यात अनेक ठिकाणी चायनीज मांजामुळे दुचाकीस्वारांचे गळे कापले जाण्याच्या व डोळ्यांना गंभीर इजा होण्याच्या घटना घडल्या आहेत.हा मांजा मानवी त्वचेसाठी तर घातक आहेच, शिवाय पक्ष्यांसाठीही कर्दनकाळ ठरत आहे. अनेकदा हा मांजा विद्युत तारांमध्ये अडकल्याने वीजपुरवठा खंडित होण्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. ही जीवितहानी टाळण्यासाठी मुर्तिजापूर पोलिसांनी केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. दुचाकीला सेफ्टी आर्च (सुरक्षा कमान) बसवल्यामुळे पतंगाचा मांजा थेट चालकाच्या गळ्यापर्यंत पोहोच शकणार नाही, ज्यामुळे अपघाताची तीव्रता लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. प्रतिबंधित चायनीज मांजाचा वापर टाळून कायद्याचे पालन करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. पोलिसांच्या या अनोख्या उपक्रमाचे शहरवासीयांकडून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

# श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा चित्रकला परीक्षेत १००% सुयश

तेल्हारा,दि.११ (प्रतिनिधी)■

तेल्हारा येथील श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा या शाळेतील विद्यार्थी एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा करीता बसले होते यामध्ये सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या संपादन केले आहे या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन सुरेशदादा खोटरे कार्यकारिणी सदस्य,सर्व आजिव सदस्य ,सर्व शाळा समिती सदस्य, उद्धवराव विखे शाळा तपासणी अधिकारी,विलासराव गावंडे मुख्याध्यापक यांनी केले आहे विशेषता सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील असून कला या विषयात त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली आहे त्याबद्दल माता पालक मंडळ यांनी सुद्धा त्यांचे कौतुक केले आहे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिक्षक शांतीकुमार सावरकर, श्रीधर लोखंडे कु.प्रियंका नंदाने यांनी केले आहे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन सर्व स्तरावरून होत आहे.

# पो.स्टे सिटी कोतवाल अकोला येथील जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस

## गुन्हयात तीन आरोपी ताब्यात व गुन्हयात वापरलेले मो.सा.जप्त

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

पो.स्टे. सिटी कोतवाली अकोला येथे अप.क्रमांक ०५/२०२६ कलम ३०९ (४) बिएनएस प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास मा. पो. नि. सा. स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी पथक नेमले असता तांत्रीक विषलेश्न व गुप्त बातमीदाराकडुन पथकाला माहीती प्राप्त झाली कि सदर गुन्हा हा ढोणे कॉलनह शिवर येथील जय गुंजकर याने त्याचे मित्रांन सोबत त्याचे जवळ असलेल्या मो.सा. ने केला आहे. अशा खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून सदर माहीती आम्ही मा. पोनि. सा स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांना दिली व मा.पो.नि.सा अकोला यांचे आदेशाने नमुद मिळालेल्या माहीती प्रमाणे जय प्रमोद गुंजकर वय - १८ वर्ष रा-ढोणे कॉलनी, शिवर जि. अकोला २) प्रज्जवल विनोद काकड वय- १९ वर्ष रा - १६ नं शाळा, आदर्श कॉलनी, अकोला. ३) रोहन जानान आंधळे वय २१ वर्ष रा- शरद नगर, गजानन महाराज मंदीर जवळ, शिवर यांना ताब्यात घेतले.




## ॲट्रॉसिटी गुन्ह्यानंतरही आरोपी फरार

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

अनुसूचित जातीतील महिलेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात विनयभंग व जातीय अत्याचाराचा गंभीर गुन्हा दाखल होऊनही आरोपी गोपाळ रामकृष्ण दांदळे दि. १ जानेवारीपासून फरार आहे. ॲट्रॉसिटी ॲक्टसह २०२३ मधील गंभीर कलमे लागू असतानाही अद्याप अटक न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपीवर कारवाई न झाल्याने तक्रारदार महिलेने सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत वरिष्ठ यंत्रणांकडे दाद मागण्याचा इशारा दिला आहे.

# चोरीस गेलेल्या दोन मोटारसायकली जप्त करून आरोपीस अटक

■अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

खदान पोलीस स्टेशन, अकोला हद्दीत दि. ०३/०१/२०२५ रोजी झालेल्या मोटारसायकल चोरीप्रकरणी नोंद असलेल्या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेने वेगाने करून दोन आरोपींचा पर्दाफाश केला असून दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. दि. ०५/०१/२०२५ रोजी फिर्यादी नितीन अंबादास झामरे यांनी त्यांच्या मालकीची होंडा शाइन मोटारसायकल (किंमत अंदाजे ४०,०००) अज्ञात आरोपींनी चोरून नेल्याची तक्रार दाखल केली होती. तपासादरम्यान तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने जेतवन नगर भागात सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. तपासात आरोपी - करण हरिदास बंगाले (वय २८, रा. जेतवन नगर, खदान), गणेश संजय धनेकर (वय २०, रा. जेतवन नगर, खदान) यांनी संगनमत करून खदान हद्दीतून दोन मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. पंचासमक्ष दोन्ही मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून संबंधित गुन्हे उघडकीस आले आहेत (अप.क्र. ००९/२०२६ व ०११/२०२६, कलम ३०३ (२) इछड). दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी खदान पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. अकोला पोलीस दला तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या वाहनांना सुरक्षित कुलूपे लावावीत, सार्वजनिक ठिकाणी उउढत परिसरात वाहन उभे करावे तसेच कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलीसांना कळवावे. सदरची कारवाई केली.



# गुरुरूपाने प्राप्त झालेल्या संतांना श्रीगुरु असे म्हणतात : ज्ञानेश्वर महाराज वाघ

हिवरखेड,दि.११ (प्रतिनिधी)■

अखिल मानव मात्रांचा पहिला गुरु ही आई असून, मंत्र तंत्रांचा उपदेश करणारे गुरु घरोघरीच प्राप्त होतात. परंतु शिष्याला सतब म्हणजे परमात्मा स्वरूपास जो प्राप्त करून देतो त्याला सद्गुरु असे म्हणतात. संत हेच खऱ्या अर्थाने जगताचे गुरु असून, प्रत्येकांचेच गुरु संत असतात असे मात्र नाही. किंबहुना केवळ तत्त्वोपदेश करतात ते गुरु व तत्वोपदेशासह हितोपदेश करतात त्यांना श्रीगुरु असे म्हणत असून, प्रामुख्याने गुरुरूपाने प्राप्त झालेल्या संतांनाच श्रीगुरु असे म्हणतात हे अभ्यासपूर्णमत भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले. ते आज चितलवाडी नामक ग्राम मध्ये परमहंस संत श्री रंगनाथ महाराज यात्रा तसेच माता लक्ष्मी देवी पुण्यतिथी निमित्ताने आयोजित सप्ताहातील कीर्तनप्रसंगी बोलत होते. ती पुढे म्हणाले की, मनुष्य चांगले कार्य करायला लागल्यानंतर त्याला मित्रा पेक्षा शत्रूच अधिक प्रमाणामध्ये प्राप्त होत असतात. त्यातही तो परमार्थिक क्षेत्रात कार्यरत असेल तर, ही संख्या कित्येक पटीने वाढण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत जीवन जगत असताना नवोदित साधकांची बरीच हेळसांड होत. त्यामुळे तो पुरता गोंधळून जाऊन प्रसंगी मार्ग सोडून जाण्याचा सुद्धा विचार करीत असतो. अशावेळी श्रीगुरुसारखा भरभक्कम पाठीराखा प्राप्त झाल्यास तो साधक इतरांची मोजदाद करीत नाही. भक्तराज अर्जुनाने गीतेच्या द्वितीयोध्यायामध्ये शिष्यत्व पत्करल्यानंतर भगवान श्रीकृष्ण हे महाभारत युद्धामध्ये त्याच्या सोबत श्रीगुरु म्हणून उभे राहिलल्यामुळेच भीष्म द्रोणांसारखे दोन तट व जयद्रथ रुपी भयंकर पाण्याचा ओघ, शकुनी मामा रुपी काळा खडक, मद्रराज शल्य जिच्यातील मगर, कृपाचार्य ज्यातील नौका तसेच कर्णा सारख्या भरतीची लाट, अश्वत्थामा व विकर्ण ज्या नदीतील घोर सुसरी आणि दुर्योधन हा जिच्यातील भवरा आहे.

अशा भयंकर रणनदीतून भगवान श्रीकृष्णांसारखा श्रीगुरु रुपी नावाडी प्राप्त झाल्यामुळे पांडव सहज करून गेले. अशा अनेक उदाहरणांनी महाराजांनी विषय श्रोत्यांना आपल्या सहज प्रासंगिक विनोदपूर्ण भाषेतून पटवून दिला तसेच आबालवृद्धांची भरगच्च उपस्थिती व शिस्त सांभाळल्याबद्दल आयोजक तथा गावकऱ्यांचे तोंड भरून कौतुक केल्याचे श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवितात.



# 'रा. से. यो कृषी महाविद्यालय अकोला तर्फे गोरवा या गावी रक्तदान शिबिर संपन्न'

अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

कृषी महाविद्यालय अकोला अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना चे सात दिवसीय निवासी शिबिराचे उद्घाटन दिनांक ०८/०१/२०२६ ला झाले. कार्यक्रम पत्रिकेनुसार आज दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी दहा वाजता रक्तदान शिबिराला सुरुवात झाली या शिबिराचे उद्घाटन या गोरवा गावचे सरपंच सौ. त्रिशीला डोंगरे यांनी केले, तर प्रमुख उपस्थिती मध्ये गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. राजेंद्र खांबलकर सर हे होते या शिबिरामध्ये रा. स. यो. चे स्वयंसेवक व स्वयंसेविका व ग्रामस्थ मंडळ यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रक्तदान केले. या कार्यक्रमात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथील डॉ. प्रथमेश हांडे, सौ शिल्पा तायडे, खुशी इंगळे, व मनाली तायवाडे व इतर सहकारी उपस्थित राहून एकूण ३१ स्वयंसेवक स्वयंसेविका व ग्रामस्थ मंडळी यांनी रक्तदान केले.



# अकोला महानगरपालिका निवडणूक : लोकशाही की मतांचा बाजार?



अकोला महानगरपालिका निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव असायला हवा होता; मात्र सध्या सुरू असलेले चित्र पाहता हा उत्सव कमी आणि भोग्यांची गर्दी, बॅनरांचा बाजार आणि राजकीय मायाजाळ अधिक वाटत आहे. शहरातील चौकाचौकात फडकणारे बॅनर, झेंडे, पोस्टर्स आणि रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पार्ट्यांमुळे संपूर्ण अकोला महानगर राजकीय गजबजाटात बुडाले आहे.

**सर्वच पक्षांत बंडखोरीची आग**

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे ड्ड सर्वच पक्षांतील बंडखोर उमेदवार. पक्षनिष्ठा, विचारधारा, नैतिकता यांना आता किंमत उरलेली नाही. राजकारण हे सेवेचे माध्यम न राहता व्यवसायाचे साधन बनले असून, सत्ता म्हणजे पैसा आणि पैसा म्हणजे सत्ता हेच सूत्र ठसवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**जात-धर्माच्या आडून नीच राजकारण**

मतदारांना विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र आणण्याऐवजी जात, धर्म, समाज आणि भावनिक विद्वेषाच्या अळीत राजकारण अडकवले जात आहे. गुंड प्रवृत्तीच्या, वादग्रस्त आणि समाजासाठी घातक असणाऱ्या लोकांना तिकीटांची खैरात वाटली जात असून, सज्जन, प्रामाणिक आणि सामान्य कार्यकर्ते मात्र या स्पर्धेतून बाहेर फेकले जात आहेत.

**मतांची खुलेआम खरेदी-विक्री**

लोकशाहीसाठी अत्यंत लाजिरवाणी बाब म्हणजे ड्ड गोरगरीब व झोपडपट्टी भागात मतांची किंमत थेट तीन ते पाच हजार रुपये ठरवली जात आहे. पैशाच्या जोरावर मत विकत घेण्याचा हा खेळ सुरू असताना, निवडणूक यंत्रणा मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचे स्पष्ट दिसते. उम ेदवाराच्या सोबत प्रचारा सुद्धा रोजंदारीने माणसे महिला प्रचारात असल्याचे चित्र शहरात पहायला मिळत आहे

**आचारसंहितेचा खुलेआम भंग**

बॅनर परवानगी कमी, पण बॅनर प्रभागात जास्त; ऑटो प्रचारासाठी तीन परवानग्या, पण रस्त्यावर दहा ऑटो; फिरत आहेत. धार्मिक स्थळांचा प्रचारासाठी गैरवापर; सोशल मीडियावर बिगर परवानगीचे खुलेआम प्रचार हे सगळे चित्र निवडणूक आचारसंहितेची अक्षरशः ऐशी-तैशी झाल्याचे दाखवते.

**निवडणूक यंत्रणा सुस्त, उमेदवार मस्त**

निवडणूक यंत्रणा मात्र या सगळ्यावर गंभीर असल्याचे जाणवत नाही. नियम मोडणारे उमेदवार निर्धास्तपणे शहरभर प्रचार करत आहेत. बैठका, सभा, रॅली, आरोप-प्रत्यारोप आणि एकमेकांवर स्टेटमेंट्स देत नेत्यांकडून लोकांचे मनोरंजन सुरू आहे; मात्र जनतेचे खरे प्रश्न मात्र कुणालाच ऐकायचे नाहीत.

**मतदार 'वेट अँड वॉच' मोडमध्ये**

मतदार मात्र सध्या अत्यंत सावध आहे. कुणालाही उघडपणे आपली भूमिका दाखवत नाही. प्रत्येक उमेदवाराला वाटते की या परिसरातील मतदान आपल्यालाच मिळणार; पण प्रत्यक्षात जनता वेट अँड वॉच मोडमध्ये आहे. नवरा-बायको, नातेवाईक, दोस्त-मित्र मिळून निवडणूक लढवण्याचे प्रकार वाढले असले तरी जनता याला स्वीकारते की नाकारते, हे निकालानंतरच स्पष्ट होईल.

**श्रीमंतांचा बोलबाला, गरीब दूर**

या निवडणुकीत श्रीमंतांचा बोलबाला असून गरीब, सर्वसामान्य, समाजासाठी प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते निवडणुकीपासून दूर फेकले जात आहेत. लोकशाही हळूहळू भांडवलदारांच्या दारात जाऊन उभी राहत असल्याचे चित्र धोक्याची घंटा वाजवणारे आहे.

अकोला महानगरपालिका निवडणूक ही केवळ सत्ता मिळवण्याची लढाई न राहता, लोकशाहीचे मूल्य जपले जाईल की पैशाच्या आणि बळाच्या जोरावर ती गहाण टाकली जाईल, याचा कस लागणारी परीक्षा ठरली आहे.

कोण बाजी मारणार आणि कोण हरणार, हे निकाल सांगतील; मात्र लोकशाही जिंकणार की हरणार, हा खरा प्रश्न आज प्रत्येक अकोलावासी मतदारांच्या मनात आहे.

**गजानन कुसुम ओंकार हरणे.**
जिल्हा परिषद नगर,खडकी
,अकोला
संवाद...९८२२९४२६२३.



# विश्व सिंधी सेवा संगमच्या संमेलनात ॲड राजेश चावला सन्मानित

अकोला,दि.११ (प्रतिनिधी)■

जगभरातील सिंधी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक सेवेसाठी कार्यरत असलेल्या विश्व सिंधी सेवा संगमचे ८वे आंतरराष्ट्रीय संमेलन भोपाळ येथे मोठ्या उत्साहात नुकतेच संपन्न झाले. या संमेलनात खा शंकर लालवानी, मध्य प्रदेशचे क्रीडा मंत्री विश्वास सारंग,भोपाळचे आ. भगवानदास साबवानी, माजी आ. गुरमुख जगवानी, गुजरातच्या माजी मंत्री निर्मला वाधवानी, माजी आयपीएस अधिकारी राजाराम, माजी न्यायाधीश ममतानी, व्हीएसएसएसचे डॉ. राजू मनवानी, गोपालदास सजनानी, सुरेश थदानी,राजस्थान, सुनील मंघरानी,जबलपूर, साई राजेशलाल, साई युधिष्ठिर व महाभारतातील द्रोणाचार्य सुरेंद्र पाल सिंग यांच्या उपस्थितीत अकोल्याचे विश्व सिंधी सेवा संगमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अँड. राजेश चावला यांना 'बेस्ट अक्टिव्हिटी पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आले.अँड. राजेश चावला हे लायन्स क्लब, वायबीसी क्लब, अकोला अर्बन बँक आदर्श कॉलनी शाखा सदस्य, अकोला पेट्रोल डीलर्स असो.चे मुख्य सचिव तसेच इतर संस्थांशी जुळलेले आहेत. मान्यवरांनी हा पुरस्कार प्रदान करून अँड. राजेश चावला यांना शुभेच्छा दिल्यात.अँड. चावलांची ही उपलब्धी समाजात कौतुकाची ठरत आहे.



RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : "पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९" (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

महाराष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

# मराठी माणूस हाच केंद्रबिंदू

तब्बल वीस वर्षानंतर ठाकरे बंधु एकत्र आल्यावर मुंबई महापालिका निवडणुकीत काहीही परिणाम होणार नाही, मुंबई महापालिकेवर महायुतीचाच महापौर बसणार, निकालानंतर सर्वात मोठे नुकसान राज ठाकरे यांचे होणार, ठाकरे म्हणजे मुंबई नाही, ठाकरे म्हणजे मराठी नाही अशा वल्गना भाजपाने निवडणूक प्रचारात, मुलाखतीत आणि पत्रकार परिषदेत अनेकवार केल्या. पण ठाकरे बंधु एकत्र आल्यापासून मुंबईची निवडणूक मराठी माणूस, मराठी अस्मिता, मराठी भाषा यावर केंद्रीत झाली आहे. ठाकरे बंधुंनी आपला मराठी माणूस अजेंडा भाजपाच्या गळी उतरवला आहे आणि भाजपाही मराठी मराठी असा गजर करीत प्रचार करताना दिसते आहे. अमराठी भाषिक विशेषत: गुजराती आणि हिंदी भाषिक ही भाजपाची मोठी व्होट बँक आहे पण मराठी माणसाला महाराष्ट्राच्या राजधानीत कमी लेखून चालणार नाही, याची जाणीव भाजपाला झाली आहे. एका मोठ्या वृत्तवाहिनेने केलेल्या पाहणीत मुंबईत मराठी मतदारांमधे ठाकरे हाच सर्वात मोठा ब्रँड आहे असे आढळून आहे.

मुंबईतील एक कोटी पेक्षा जास्त संख्यने असलेल्या मतदारांमधे ३८ टक्के मतदार हे मराठी असल्याचे राजकीय पक्षांचे म्हणणे आहे. गेल्या पंधरा वर्षात जनगणना झाली नसल्याने मुंबईत मराठी भाषिक नेमके किती आहेत, याची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. ठाकरे बंधु दूर होते तेव्हा भाजपाला मोठा दिलासा होता, नंतर ठाकरेंची शिवसेना व शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्यानंतर भाजपाला महाराष्ट्रात विस्तारासाठी रान मोकळे झाले. विरोधी पक्षात फूट पाडायची, विरोधी पक्षातील नेते आपल्या पक्षात आणून विरोधकांना दुर्बल करायचे ही भाजपाची आजही रणनिती आहे. आपले व आपल्या पक्षाचे अस्तित्व टिकविण्यासाठी ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याने मुंबईत काहीच फरक पडणार नाही असे भाजपाला आजही वाटते का ? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वगळता, भाजपाकडे मुंबई व राज्यात चौफेर फिरणारा दुसरा नेता नाही. भाजपाचे अन्य राज्यातून जे नेते प्रचाराला आले ते मुंबईतील त्या-त्या राज्याच्या भाषिक मतदारांमधे भाषणे ठोकून परत गेले. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा वावर मुंबई-कोकणापुरताच मर्यादीत राहिला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शडो प्रदेशाध्यक्ष म्हणून ओळखले जातात. ते प्रत्येक विषयावर मतप्रदर्शन करीत असतात, अनेकदा त्यांना अतिउत्साहामुळे यू टर्न करावा लागला.

शहात्तर हजार कोटीचे बजेट असलेल्या मुंबई महापालिकेवर वाट्टेल ते करून कब्जा मिळवायचा हा भाजपाचा अजेंडा आहे. मराठी माणूस या मुद्दयाकडे भाजपाला खेचून घेण्यात ठाकरे बंधुंना बरेच यश आले आहे. ठाकरेंच्या शिवसेनेने मुंबई महापालिकेत पंचवीस वर्षे भ्रष्टाचार केला असा आरोप भाजपा करीत आहे, पण या काळात मुंबई महापालिकेत शिवसेनेबरोबर भाजपा सत्तेत भागिदार होता हे का लपवून ठेवले जात आहे ? सन २०१७ मधे भाजपाचे ८२ नगरसेवक निवडून आले तर शिवसेनेचे ८४ विजयी झाले. तेव्हा सत्तेत सहभागी न होण्याचा निर्णय भाजपाने जाहीर केला होता. आम्ही पहारेकरी म्हणून भूमिका बजावणार आहोत, असे भाजपाने म्हटले होते. मग नंतरच्या पाच वर्षात महापालिकेत भ्रष्टाचार होत असताना हा पहारेकरी झोपला होता का ? वर्षभराच्या काळात भाजपाने लोकसभा, विधानसभा व नगर परिषद पंचायती अशा तीन निवडणुका लढवल्या व सत्ता काबीज केली. आता राज्यातील २९ पैकी मुंबईसह २७ महापालिकांवर कमळ फुलविण्याचे भाजपाचे टार्गेट आहे. बहुतेक महापालिकांमधे चार ते नऊ वर्षांनी निवडणुका होत आहेत. हा विलंब का लागला, कुणामुळे लागला, मतदारांना मतदानाच्या हक्कापासून वर्षानुवर्षे का वंचित ठेवण्यात आले याचा खुलासा कोणताही राजकीय पक्ष करीत नाही. पूर्वी भाजपा-शिवसेना युती होती व आजही आहे. पूर्वी ठाकरेंची शिवसेना भाजपाबरोबर होती आता शिंदेंची शिवसेना भाजपाबरोबर आहे. शिंदेंच्या शिवसेनेला मुंबईत २२७ पैकी जास्तीत जास्त ५२ जागा देऊ असे भाजपा सांगत होती, जेव्हा ठाकरे बधुंनी एकत्र येऊन निवडणूक लढविण्याची घोषणा केली तेव्हा त्याचा लाभ शिंदेना झाला व भाजपाने त्यांच्या पक्षाला ( शिवसेनेला ) ९० जागा सोडल्या. सन २०१७ मधे भाजपाने शिवसेनेशी युती न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत दिलेल्या एकूण उमेदवारांमधे ४५ टक्के मराठी भाषिक होते. यंदा २०२६ मधे भाजपाने दिलेल्या उमेदवारांमधे ६८ टक्के मराठी उमेदवार आहेत. भाजपाच्या यादीत मराठी टक्का वाढला आहे त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ठाकरे बंधुंची युती हे आहे.

ठाकरे बंधुंना डिवचण्यासाठी भाजपाने अनेक खेळी खेळल्या. ठाकरे बंधु सत्तेवर आले तर मुंबईचा महापौर खान होईल अशी भिती मुंबईकरांना घातली. गेल्या लोकसभा निवडणुकीपासून मुंबई व महाराष्ट्रातील मुस्लिम मतदार शिसवेनेकडे सरकला आहे हे भाजपाचा ठाऊक आहे. भाजपा नको या भावनेतून मुस्लिम व्होट बँक ठाकरेंच्या उबाठासेनेकडे आकर्षित झाली आहे. मुंबई भाजपाचे उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांनी तर मीरा भाईंदरमधे प्रचार करताना मुंबईचा महापौर उत्तर भारतीय होईल असे भाकीत केले. या प्रचारावरून टीकेची झोड उठवताच भाजपाने आपले हिंदू कार्ड बाहेर काढले व मुंबईचा महापौर हिंदू असेल असे जाहीर केले. अन्य भाषिक हिंदु असू शकतात, हिंदू महापौर म्हणून मुंबईवर अमराठी लादण्याचा भाजपाचा डाव आहे अशी टीका झाली. मराठी माणूस हा हिंदू नाही का ,या प्रश्नावरून काहूर माजताच भाजपाने आता मुंबईचा महापौर मराठीच होईल असा जप सुरू केला आहे. ठाकरे बंधुंनी फेकलेल्या मराठी माणसाच्या जाळ्याकडे भाजपा कशी ओढली गेली हेच गेल्या पंधरा दिवसात बघायला मिळाले.

मुंबई नि मराठी माणसाचे डेथ वॉरंट निघाले आहे. मुंबई (महाराष्ट्रापासून) वेगळी करणे ही ज्यांची इच्छा आहे, तेच केंद्रात आहेत आणि तेच राज्यात आहेत. मुंबई महापालिकेत तेच सत्तेत आले तर मराठी माणूस काहीही करू शकणार नाही, या गोष्टींकडे हतबलतेने पाहणे आमच्याकडून होणार नाही, म्हणून आम्ही एकत्र आलो आहेत, अशा शब्दात मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी आली भूमिका स्पष्ट केल्यानंतर भाजपाला मुंबई व मराठी माणूस या मुद्द्यावरच आपला प्रचार केंद्रीत करणे भाग पडले. चंद्र-सूर्य आकाशात आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्रापासून कोणीही वेगळी करू शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगत आहेत. पण त्याच वेळी तामिळनाडूमधील भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष अण्णा मलई यांनी मुंबईत येऊन मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी नाही तर मुंबई एक आंतराष्ट्रीय शहर आहे असे सांगून मुंबई व मराठीच्या वादात आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. भाजपाचे दोन नेते , एक राज्यातील व दुसरा दक्षिणेतील कसे पस्परविरोधी बोलतात त्याचे हे उदाहरण आहे. हे सर्व ठरवून होते आहे का ?

# युवकांचे प्रेरणास्रोत : स्वामी विवेकानंद

भारतभूमीच्या वैचारिक आकाशात जे काही तेजस्वी नक्षत्रे उदयाला आली, त्यांपैकी स्वामी विवेकानंद हे एक अतुलनीय नाव आहे. केवळ एका व्यक्तीचे नाव नव्हे तर जागृत चेतनेचा, आत्मविश्वासाचा आणि राष्ट्रोद्धाराच्या विचारांचा ते एक जिवंत प्रवाह आहे. १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांची जयंती म्हणून साजरी केली जातो, परंतु खऱ्या अर्थाने हा दिवस युवकांच्या आत्मपरीक्षणाचा, आत्मजागृतीचा आणि नव्या संकल्पांचा दिवस ठरावा अशीच त्यांची अपेक्षा होती.

स्वामी विवेकानंदांचा जन्म १८६३ साली कोलकात्यात झाला. नरेंद्रनाथ दत्त या तरुणाने पुढे संन्यास स्वीकारून 'विवेकानंद' हे नाव धारण केले. बालपणापासूनच त्यांच्या मनात प्रश्नांची गर्दी होती.ईश्वर कोण? जीवनाचा अर्थ काय? माणसाचे कर्तव्य काय? या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यांना श्रीरामकृष्ण परमहंस ' गुरू' म्हणून लाभले . गुरू-शिष्याच्याया नात्यातूनच विवेकानंदांचा तेजस्वी विचारविश्वाचा जन्म झाला.

स्वामी विवेकानंदांचे कार्य बहुआयामी होते. त्यांनी हिंदू धर्माला केवळ कर्मकांडात अडकलेला, मागास धर्म म्हणून नव्हे तर विश्वकल्याणाचा संदेश देणारा, वैज्ञानिक आणि मानवतावादी धर्म म्हणून जगासमोर मांडले. प्रत्येक जीवात शिव आहे ही अद्वैताची संकल्पना त्यांनी सामान्य माणसापर्यंत पोहोचवली. सेवा म्हणजेच साधना आणि दरिद्र नारायणाची सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा,हा विचार त्यांनी कृतीतून जगाला दाखवून दिला.

१८९३ साली शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी केलेले भाषण हे भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील सुवर्णपान आहे. माय ब्रदर अँड सिस्टरस ऑफ अमेरिका या शब्दांनी त्यांनी आपले भाषण सुरू केले आणि संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले. त्या एका क्षणात भारताचा आत्मा जागतिक व्यासपीठावर उभा राहिला. सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव आणि मानवता या हिंदू धर्माच्या मूलतत्त्वांची त्यांनी जगाला ओळख करून दिली. धर्म म्हणजे द्वेष नव्हे, तर समन्वय. धर्म म्हणजे संघर्ष नव्हे, तर संवाद हा संदेश त्यांनी ठामपणे मांडला.

स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्मासाठी जे कार्य केले, ते केवळ प्रचारापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना करून शिक्षण, आरोग्य, सेवा आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणला. आजही रामकृष्ण मिशन समाजसेवेचे एक आदर्श केंद्र म्हणून कार्यरत आहे.

शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे खरे साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी मनुष्यनिर्मितीचे शिक्षण, चारित्र्य घडवणारे शिक्षण यावर भर दिला.

उठा, जागे व्हा आणि ध्येय गाठेपर्यंत थांबू नका हा त्यांचा सिंहगर्जना करणारा संदेश आजच्या युवकांसाठी अधिकच अर्थपूर्ण आहे. आधुनिक युगातील युवक अनेक आव्हानांनी वेढलेला आहे.व्यसनांचे आकर्षण, दिशाहीनता, स्पर्धेचा ताण, नैराश्य. अशा वेळी विवेकानंदांचे विचार दीपस्तंभासारखे मार्ग दाखवतात. त्यांनी युवकांना शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक दृष्ट्या सक्षम होण्याचा संदेश दिला. दुर्बलता हे पाप आहे असे त्यांनी निर्भीडपणे सांगितले.

आजचा युवक जर खऱ्या अर्थाने स्वामी विवेकानंदांना अभिवादन करू इच्छित असेल, तर केवळ जयंती साजरी करून थांबणे पुरेसे नाही. व्यसनांपासून दूर राहणे, शरीरसंपन्न व सुदृढ जीवन जगणे आणि मनाला विचारांनी समृद्ध करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

पुस्तकांची मैत्री हा विवेकानंदांचा अत्यंत महत्त्वाचा संदेश आहे. वाचनातून विचारांची प्रगल्भता येते, दृष्टिकोन व्यापक होतो आणि आत्मविश्वास बळकट होतो. युवकांनी मोबाईलच्या स्क्रीनऐवजी पुस्तकांच्या पानांत हरवायला शिकले तर त्यांचे जीवन नक्कीच उजळून निघेल.

स्वामी विवेकानंद हे केवळ संन्यासी नव्हते तर ते कृतीशील विचारवंत होते. त्यांनी तरुणांना संन्यास नव्हे तर कर्तव्य शिकवले. देशासाठी काहीतरी करणे, समाजातील दुर्बल घटकांसाठी उभे राहणे आणि स्वतःच्या जीवनात सतत नवीन प्रयत्न करणे,हीच विवेकानंदांची खरी शिकवण आहे. अपयशाने खचून न जाता, त्यातून शिकत पुढे जाण्याची प्रेरणा त्यांनी दिली.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि भौतिक सुखांची रेलचेल आहे.पण तरीही माणूस अस्वस्थ आहे. अशा वेळी विवेकानंदांचे अध्यात्म हे पलायनवादी नसून जीवनाला दिशा देणारे आहे. आत्मविश्वास, स्वाभिमान आणि मानवतेची जाणीव या मूल्यांची आज नितांत गरज आहे. युवकांनी विवेकानंदांचे विचार केवळ भाषणांत न ठेवता, प्रत्यक्ष जीवनात उतरवले तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती घडू शकेल.

स्वामी विवेकानंद हे काळाच्या पुढे पाहणारे द्रष्टे होते. त्यांनी युवकांवर अपार विश्वास ठेवला. मला शंभर तरुण द्या, मी भारताचे भविष्य घडवीन असे ते ठामपणे म्हणत. आज त्या विश्वासाला उत्तर देण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे. विवेक, विचार आणि मूल्यांच्या आधारे जीवन जगण्याचा



संकल्प युवकांनी केला तर स्वामी विवेकानंदांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी झालेली असेल.

स्वामी विवेकानंदांचा तेजस्वी विचारदीप आजही मार्गदर्शन करत आहे. तो दीप हातात घेऊन, नव्या आत्मविश्वासाने, नव्या संकल्पांनी आणि नव्या प्रयत्नांनी युवकांनी पुढे जायला हवे. कारण विवेकानंदांचे विचार कालबाह्य झालेले नाहीत.उलट, ते आजच्या काळात अधिकच सुसंगत आणि आवश्यक आहेत.

**डॉ. राजेंद्र विमल रामहरी टेकाडे**
**काटोल जि. नागपूर**
**संपर्क : ९१४५७७९०५०**

## आजची युवा पिढी...

जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात. संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अजब युती

महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणात एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून ओळख असलेल्या काँग्रेस व भाजपाने अंबरनाथ येथे सत्तेसाठी युती केल्यामुळे नवा पेज निर्माण झाला आहे.अंबरनाथ ठाणे जिल्ह्याचा भाग असून या भागाचे खासदार म्हणून डॉक्टर श्रीकांत शिंदे निवडून आले होते. अंबरनाथ नगरपरिषदमध्ये साठ सदस्य असून या नगरपालिकेत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही.शिंदे सेनेने २७ जागा जिंकल्या त्या पाठोपाठ भाजपने १४ तर काँग्रेसचे १२ नगरसेवक निवडून आले होते.कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे त्रिशंकू स्थिती निर्माण झाली. सध्या सत्तेसाठी काहीही केल्या जात आहे. महाराष्ट्राच्या सत्तेत वाटेकरी असलेले भाजपा, अजित पवार, एकनाथ शिंदे, सध्याच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकमेका विरोधात उभे आहेत.पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अजित पवार आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आलेली संपूर्ण महाराष्ट्राने बघितला आहे. सत्तेसाठी राजकीय पक्ष आणि राजकीय नेते कोणत्याही थराला जाऊन सत्ता मिळवणे हा एकमेव ध्येय ठेवून कार्य करीत आहे.सध्याच्या राजकारणाने नैतिकतेची पूर्ण पातळी सोडून पैसा व सत्ता या दोन गोष्टीला महत्त्व देत आहे. सामान्य माणूस आहे त्याच ठिकाणी आहे. सामान्य माणसाने केवळ मतदान करावे व घरी चुपचाप बसावे असा एकूण घटनाक्रम आहे.

राजकारणाचे सध्याचे रूप पाहता राजकारण अधिकाधिक जटील होत जात असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.उद्धव ठाकरे यांची शिवसेना तोडल्या गेली.एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडली.यासाठी भाजपा ने पाहिजे ती मदत शिंदेंना केली होती.पक्षाचे चिन्ह व नाव सुद्धा एकनाथ शिंदेंना मिळाले होते. जगातील सर्वात मोठ्या पक्षांचे आपणास समर्थन आहे आणि त्या पक्षासोबत आपण युती करणार आहोत असे एकनाथ शिंदेनि शिवसेना फोडतेवेळी घोषित केले होते.सर्वात मोठा व शक्तिशाली पक्ष म्हणून भाजपासोबत एकनाथ शिंदे युती करणार व महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन होणार हे स्पष्ट होते.ज्यांनी शिवसेना स्थापन केली व मोठे कष्ट करून जन माणसात शिवसेनेला मोठे नाव प्राप्त करून दिले त्या बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना दोन गटात विभागली गेली.ईडी , सी.बी.आय , इन्कम टॅक्स या शासकीय संस्थांचा धाक दाखवुन शिवसेना तोडण्यात आले होते. सोबतीला एका आमदाराचा भाव ५० कोटी रुपये ठरवण्यात आल्याची चर्चाही होऊ लागली. पन्नास खोके एकदम ओके असा नारा प्रचलित झाला. पैशाच्या बळावर आणि शासकीय यंत्रणाच्या धाक दडपशाहीने शिवसेना दुभंगली.एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले पाठोपाठ शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत उभी फूट पडली. अजित पवारांनी वेगळा गट तयार केला व सत्तेत तेही ही सहभागी झाले. ईडी, सी.बी.आय, इन्कम टॅक्स या शासकीय तपास यंत्रणां पासून आपले रक्षण करायचे असेल तर स्वतः पक्ष बदल करणे आवश्यक आहे.हा नवा विचार रूढ झाला.स्वातंत्र्यानंतर कधी नवे एवढ्या मोठ्या प्रमाणात पक्ष बदल होत आहेत.पक्षाची विचारधारा आणि नैतिकता याचा पूर्णतः ऱ्हास होत आहे.कुणीही पक्षनिष्ठा पाळीत नाहीत.सकाळी एका पक्षात तर सायंकाळी पक्ष बदल करून दुसऱ्या पक्षात अशी सध्याच्या राजकारणाची रीत झाली आहे.अजित पवार सत्तेत आहेत,त्यांना अजूनही ७० हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळ्या प्रकरणी निर्दोष मुक्तता झालेली नाही.

न्यायालयात अजूनही खटला सुरूच आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदर घोटाळ्याची आठवण अजित पवारांना करून दिलेली आहे. उद्याच्या घडीला अजित पवार सत्ताविरोधी वागणूक केली तर त्यांच्या मुसक्या कशा आवरायच्या याचा संपूर्ण हिशोब भाजपाने करून ठेवला आहे. म्हणून महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये अजित पवारावर अनेक बंधने आहेत. एकनाथ शिंदे आणि अजित पवारांची भविष्यकाळात खच्चीकरण केल्या जाईल असे चित्र आहे. इकडे आड तिकडे विहीर अशी दोघांची स्थिती आहे. मुंबई येथे बोलताना अमित शहा यांनी शत प्रतिशत भाजपा असा नारा दिला होता. कुबड्यांचे सरकार नको स्वतःचे स्थान निर्माण करा असा स्पष्ट संदेश अमित शहा यांनी दिला होता. भविष्यकाळात छोटे छोटे राजकीय पक्ष भाजपा संपवून टाकील असा राजकीय निरीक्षकांच्या अंदाज आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एकूण ७० नगरसेवक अविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले यात भाजपाचे सार्वधिक ४४ नगरसेवक शिंदे सेनेचे २१ व इतर असून नगरसेवक अविरोध निवडून आले .आज पर्यंतच्या निवडणुकीच्या विचार केला तर कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणात नगरसेवक अविरोध निवडून आल्याचे इतिहासात दिसून आले नाही. आज मात्र अविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांची संख्या वाढत आहे ही बाब लोकशाही शासन व्यवस्थेसाठी निश्चितच स्वागतार्य नाही. असे विरोधी पक्षांनी म्हटले आहे. शहराच्या ठिकाणी एकही उमेदवार उभे राहू शकत नसेल तर भविष्यकाळात निवडणुका होणार की नाहीत असा प्रश्न नागरिकांच्या मनात घर करून आहे.

आपल्या प्रतिनिधी निवडण्याची संधी पाच वर्षांनी जनतेला मिळते मात्र अविरोध निवडणुका होत असल्यामुळे नागरिकाच्या मतधिकाराचे काय असा प्रश्न निर्माण होतो आजकालच्या निवडणुका पैशांच्या ताकदीवर लढल्या जात आहे. अमाप पैसा असलेले लोक रिंगणात उभे असलेल्या उमेदवारांना पैशाचे आम्हीच दाखवून माघार घ्यायला लावीत आहेत. सोबत पोलीस यंत्रणा, तपास यंत्रणा, धाकदापटपणा, गुंडाकरवी धमक्या , अशा कारणामुळे अविरोध निवडून येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. सत्तेच्या परिघात असलेल्या भाजपा, शिंदे सेना, अजित पवार, यांचेच उमेदवार अविरोध निवडून येतात इतर पक्षाचे उमेदवार अविरोध निवडून येत नाहीत हा खरा प्रश्न आहे. जनतेने या गोष्टीच्या बारकाईने विचार केला पाहिजे मजबूत लोकशाही शासन व्यवस्थेसाठी अविरोध निवडणुका धोक्याची घंटा आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एका व्यक्तीला एक एक मत याची तरतूद घटनेत केली त्या मताचे मूल्य मोठे आहे याची जाणीव आपल्याला असणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत अभ्रद युतीने कळस गाठला आहे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक धाडसी निर्णय घेतला त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. अंबरनाथच्या १२ नगरसेवकांना तत्काळ पक्षातून काँग्रेसने निलंबित केले. पक्षाची ध्येयधोरणे विचार बाजूला सारून सत्तेसाठी वाटेल त्या तडजोडी स्वीकारल्या जाणार नाहीत हा संदेश यातून काँग्रेस जनापर्यंत पोहोचला. काँग्रेस मुक्त भारत असा नारा मोदी, शहाणी दिला मात्र काँग्रेस हा विचार आहे तो कधीही संपणारा नाही अनेकांनी काँग्रेस संपवण्याची भाषा केली मात्र काँग्रेस संपलि नाही भविष्यकाळात काँग्रेससाठी निश्चितच चांगले दिवस येतील अशी परिस्थिती निर्माण होईल यात शंका वाटत नाही.

**नितीन कैलासराव गोहने**
**रा.हिरापूर ता.सावली जि.चंद्रपूर**
**मो.नं : ८२७५३९३३८७**

# माझ्या जिजाऊंची ख्याती, साऱ्या जगावरती

*अंधविश्वास, विषमतेवर करून वार*
*समतेच्या स्वराज्यासाठी झाली स्वार*
*रणरागिणी, पराक्रमी शोर्य तिचे गाऊ*
*वंदन तुला जिजाऊ, वंदन तुला जिजाऊ*
*रयतेच्या स्वराज्यासाठी बाळ शिवबाच्या हाती*
*माँ साहेब जिजाऊ तलवार देती*
*जगभर पसरे शिवबांची ख्याती*
*जगाच्या इतिहात शिवराय पाहू*
*वंदन तुला जिजाऊ, वंदन तुला जिजाऊ*

जिजाऊ हे केवळ नाव नाही तर पराक्रम, शौर्य, अंधविश्वास मातीत गाडून विज्ञानाचा प्रकाश, विषमतेला पायदळी तुडवून सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या समता दुत आहेत. दोन दोन पराक्रमी राजे घडवून जग जिंकण्याची उर्जा भरणाऱ्या त्याच रयतेच्या स्वराज्याच्या खऱ्या प्रेरणा स्त्रोत आहेत. जिजाऊंचे कार्य, विचार, पराक्रम आणि शौर्य हे जगाने दखल घ्यावे असेच आहे. मुलीला घराबाहेर पडण्याचा अधिकार नसलेल्या काळात जिजाऊंनी घोड्यावर स्वार होऊन घोडेस्वारी, युद्धकला शिकावी हे तर येथील व्यवस्थेला टोचणारे आणि बोचणारे होतेच. जिजाऊंचा संघर्ष आणि स्वराज्याची स्वप्न हे जागतिक पातळीवरील कार्य आहे. कारण जिजाऊंनी घडवलेल्या दोन दोन राजांनी जे शुर पराक्रम गाजवले ते सर्व पराक्रम विदेशी लोकांना हरवून बनवले. याचाच अर्थ जगातील योद्धांना हरवणारी ताकद निर्माण करणारी जिजाऊ किती पराक्रमी व शुर असतील याची प्रचिती येतेच. १२ जानेवारी हा दिवस फक्त जिजाऊ जन्मदिवस नसून तमाम भारतीय लोकांचा प्रेरणा दिवस आहे. आज जवळपास साडे चारशे वर्षे होत आहेत तरीही जिजाऊंचे स्मरण करून मोठ्या थाटामाटात जयंती साजरी केली जाते. याचे कारण काय ? देशामध्ये सध्या लोकशाही अस्तित्वात असुन राजेशाहीतील जिजाऊ व त्यांनी निर्माण केलेले रयतेचे खरे छत्रपती, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज पुढील काळात राजर्षी शाहु महाराज आजही वंदनीय व आदरणीय आहेत याचे कारण म्हणजे हे लोक राजे असुनही जनतेच्या कल्याणासाठी, सामाजिक विकासासाठी, समतेसाठी आपले आयुष्य खर्ची घातले. राजे असुनही सर्वसामान्य जनता, शेतकरी यांचे हित बघितले, सत्ता आणि पैसा हाती असुनही न्यायाची भुमिका घेऊन पैशाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या भल्यासाठी केला. म्हणून हे महापुरुष वर्षानुवर्षे आपल्याला वंदनीय व आदरणीय आहेतच. आणि आजही आम्हाला त्यांच्या कडून प्रेरणा मिळत आहे. जिजाऊंचे कार्य हे शब्दांत मांडता येत नाही. पुस्तकात बंद करता येत नाही. आपण महापुरुषांच्या जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करतो याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी संघर्ष करून आम्हाला जे काही दिले त्याची जाणीव ठेवून त्यांच्या विचार व कार्याला नतमस्तक जयंती दिनी होत असतो. परंतु हे करत असताना ज्यांची जयंती आपण साजरी करतो त्यांचे विचार व कार्य यांची समिक्षा करणे आवश्यक असते. कारण ज्यांची जयंती आपण मोठ्या उत्साहात साजरी करतो त्यांच्या विचार व कार्य आजच्या काळात परिस्थिती आहे हे सुद्धा बघने आवश्यक आहे. जसे जिजाऊंनी शिवबाला घडवले संस्कार व नैतिकता दिली म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांनी शत्रुच्या स्त्रिचा देखील सन्मान केला. याची नोंद जगाने घेतली आहे. पण खरचं आज लोकशाही आहे. लोकशाही मध्ये ज्यांच्या हातात सत्ता आहे ते स्त्रियांचा सन्मान करतात का? यावर



विचार होणे गरजेचे आहे. जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेणारे लोक शत्रुची सोडा हो पण स्वतः धर्मातील स्त्रियांवर अन्याय अत्याचार करून आरोपींना पाठीशी घालतात हे विकृत विचार व कृत्य करणारे लोक जिजाऊंध्या विचाराचे व धर्माचे कसे होऊ शकतात? राजे असुन कोणाचीही राजां विरोधात बोलण्याची हिम्मत नसतांना जिजाऊंच्या संस्कारामुळे स्त्रिया सुरक्षित होत्या. स्त्रि कडे वाईट नजरेने बघाण्याचे डोळे काढून आजजन्म अंधार कोठडीत छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्यांना ठेवले ते शिवाजी महाराज यांच्या सैन्यातील होते. आज पक्षातील व धर्मातील लोकांनी काहीही केले तरी माफ आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात शेतकरी सुखी होता, शेतकऱ्यांना समस्या नव्हत्या. छत्रपती शिवाजी महाराजां नंतर आता लोकशाही आली. आता प्रत्येक जन देशाचा मालक आहे. राजकीय नेते व अधिकारी, कर्मचारी सेवक आहेत तर काय आज शेतकरी सुरक्षित आहे? शेतकरी समस्या हीन आहे? यावर विचार करणे खूप आवश्यक झाले आहे. कारण आमच्या महापुरुषांचे विचार व कार्य पायदळी तुडवून धर्माचा बुरखा अंगावर घेऊन धर्माला व महापुरुषांना बदनाम करण्याचे षडयंत्र सुरू आहे. जातीभेद नष्ट करून प्रत्येक माणसाला सारखी वागणूक मिळण्यासाठी मावळा शब्द वापरून स्वराज्य निर्माण केले. जिजाऊ च्या मार्गदर्शना खाली जातीभेद, विषमता नष्ट करून जागतिक क्रांती झाली होती. परंतु आज त्याच जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात त्यांचेच नाव घेऊन माणसा माणसात द्वेष पसरवण्याचे काम सुरू केले आहे. जिजाऊ च्या संस्कारातून घडलेल्या राजांनी स्वतः राजा असताना, कोणाचीही राजा विरोधात एकही शब्द बोलण्याची हिंमत नसताना जनतेचा एक एक रुपया स्वतः च्या मौजमजे साठी नव्हे तर जनतेच्या कल्याणासाठी वापरला. शेतकऱ्यांना भरभरून मदत करून शेतकऱ्यांच्या मिरची च्या देठालाही धक्का लागणार नाही एवढी काळजी घेणाऱ्या राजाच्या देशात मात्र त्यांचेच नाव घेऊन, जनता प्रश्न विचारला असताना जनतेचा पैसा लुटणाऱ्या राजकीय टोळ्या निर्माण झाल्या. शेतकऱ्यांच्या समस्या जाणीवपूर्वक वाढवून शेतकऱ्यांना हवालदिल केले जात आहे. शेतकऱ्यांना देशद्रोही समजून भिकाऱ्या सारखी वागणूक देणारे राजकीय नेते येथे निर्माण झाले हे जिजाऊंच्या विचाराच्या विरोधात आहे. जिजाऊंची जयंती साजरी करताना मनात उत्साह तर आहेच कारण रुढी, परंपरा झूगारून अंधविश्वास व कर्मकांड जाळून टाकून समतेची ज्योत पेटवण्ताचे ऐतिहासिक काम जिजाऊंनी केले. आपले संस्कार व परिवर्तनवादी विचाराच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडवून आणली. परंतु दुसरी बाजू बधितली तर ज्या जिजाऊंची जागतिक ख्याती आहे त्याच जिजाऊंना मर्यादित करण्याचा प्रयत्न केला जात. ज्या जिजाऊंनी संस्काराच्या माध्यमातून स्त्रियांचा सन्मान केला त्याच जिजाऊ च्या देशात स्त्रियावर अन्याय अत्याचार, बलात्कार केले जात आहेत, न्याय मागायला गेल्यावर आरोपींना बेल आणि पिडीतेला जेल असे अनेक उदाहरणे येथे घडले आहेत आणि यातच माझ्या जिजाऊंचे संस्कार तुडवले गेले ही बाब मनाला चटका देऊन जाते. म्हणून जयंती साजरी करताना आपण विचाराची व कार्याची समिक्षा केली पाहिजे. जिजाऊंचा जिवनपट संघर्ष तर आपल्याला माहिती पाहीजेच. पण त्या पेक्षा ही महत्त्वाचे आहे जे जिजाऊंनी आपल्या विचार व कार्याच्या माध्यमातून निर्माण केले आहे ते विचार व कार्य यांचे संवर्धन झाले पाहिजे. कारण जिजाऊ शिवबाची दखल साऱ्या जगाने घेतली आणि त्यांना आदर्श माणून जग पुढे जात आहे. आपण त्यांचे आचार विचार मातीत तुडवून अधोगतीला जात आहोत. जयंती साजरी करताना आपल्याला जिजाऊंचे कार्य व विचार ज्वलंत ठेवून त्याचा प्रचार प्रसार करावा लागणार आहे. आणि संस्कार, संस्कृती स्वराज्याला आडकाठी असलेल्या प्रत्येकाला त्याची जागा दाखवावी लागणार आहे. जिजाऊ अंधविश्वास व थोतांड मान्य करत नव्हत्या म्हणून शिवाजी महाराज यांनी संपूर्ण लढाया अमावस्येच्या रात्रीच लढून जिंकल्या, जातीला स्थान नव्हते कोणी उच्च निच नव्हते म्हणून प्रत्येकाला मावळा ओळख होती. जात धर्म बघुन नाही तर गुणवत्ता बघून कामाची विभागणी होती म्हणून प्रत्येक खात्यात गुण कौशल्य बघून लोक होती. हिच संस्कृती हेच विचार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान मध्ये घेतले आणि जागतिक पातळीवरील एकमेव आदर्श संविधान लिहले. आज संविधाना विषयी, जिजाऊंच्या कार्य व विचाराविषयी आपण जागृत झालो नाही तर जागतिक पातळीवर जिजाऊ चे कार्य व विचार मर्यादित होतील व हळूहळू आम्ही विचार आणि संस्कारा पासुन दुर जाऊन जिजाऊची महती व किर्ती फक्त पुस्तकात बंद राहील.

*चला आपण जिजाऊंचे विचार पेरू*
*अंधविश्वास, भेदभाव, द्वेष बाजूला सारू*
*आम्ही जिजाऊंची लेकरं सारी*
*लोक कल्याणासाठी हातात हात धरू*

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर, मोबा: ९१३०९७९३००



# मुलींनीच केलं लग्न!

बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या या दोन मुली 'सोशल मीडिया'वर भेटल्या. त्यांनी नंबरची देवाणघेवाण केली आणि बोलू लागल्या. एकमेकींच्या प्रेमात पडल्या आणि नंतर लग्न केले.बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील एका अनोख्या लग्नाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. या लग्नाबद्दल ऐकून लोक खूप आश्चर्यचकित झाले आहेत. या लग्नाची चर्चा केवळ सुपौलमध्येच नाही, तर आजूबाजूच्या परिसरातही होत आहे आणि त्याचे कारण म्हणजे हे मुलगा आणि मुलीतील लग्न नव्हते, तर दोन मुलींमधील लग्न होते. त्यांनी साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर एका मंदिरात लग्न समारंभ पूर्ण केला.

२१ वर्षीय पूजा आणि १८ वर्षीय आरती प्रेमात पडल्या. त्या इंस्टाग्रामवर भेटल्या आणि नंबरची देवाणघेवाण केली. त्यांनी दोन वर्षांपूर्वी प्रथम बोलणे केले आणि तेव्हापासून त्यांची प्रेमकहाणी सुरू आहे. पूजा आणि आरती म्हणतात,त्यांना मुलांमध्ये रस नाही, म्हणून त्यांनी एकमेकींशी लग्न केले. पूजा आणि आरतीने साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर त्रिवेणीगंज मेळा मैदानावरील मंदिरात लग्न केले.आता लग्न झालेल्या पूजा आणि आरती 'सोशल मीडिया'वर भेटल्या; परंतु त्या दोघीही एकाच मॉलमध्ये काम करत होत्या. हळूहळू त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. पूजा आणि आरती म्हणतात, आम्ही भाड्याच्या खोलीत एकत्र राहू लागलो. त्या म्हणतात, आम्ही जोडप्यासारखे एकत्र राहू लागलो. आमच्या दोघींचीही कुटुंबं या लग्नासाठी अजिबात तयार नव्हती, म्हणून आम्ही आधी लग्न केले आणि नंतर आमचे फोटो 'सोशल मीडिया'वर अपलोड केले.

कॅलिडोस्कोप

# मांसाहारी प्रसाद?

पूजा अर्चा करताना किंवा उपवास करताना सात्विक आहार घ्यायचा असतो, असे आपण आजवर ऐकले आणि वाचले असेल. परंतु तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल, की भारतातील काही मंदिरात मांसाहारी प्रसाद दिला जातो. भारतात अनेक मंदिरांमध्ये देवीला किंवा ग्रामदैवताला मांसाहार अर्पण केला जातो. या मागे धार्मिक आणि सांस्कृतिक कारणे आहेत.

*** मुनियंडी स्वामी मंदिर, तामिळनाडू**

तामिळनाडूतील मदुराई जिल्ह्यातील वडक्कम पट्टी या लहान गावातील मुनियंडी स्वामी मंदिरात भगवान मुनियादी (भगवान शिवाचे अवतार मुनिश्वर नावाने ओळखले जातात) यांची पूजा केली जाते. दरवर्षी येथे तीन दिवसांचा वार्षिक उत्सव साजरा केला जातो. या मंदिरात प्रसाद म्हणून चिकन आणि मटण बिर्याणी दिली जाते. लोक सकाळी बिर्याणी खाण्यासाठी मंदिरात गर्दी करतात.

*** विमला मंदिर, ओडिशा**

देवी विमला (दुर्गा मातेचे एक रूप) या देवीला पूजेदरम्यान मांस आणि मासळीचा नैवेद्य दाखवला जातो. हे मंदिर ओडिशाच्या पुरी स्थित जगन्नाथ मंदिर परिसरात आहे आणि यास शक्तीपीठांमध्ये गणले जाते. दुर्गा पूजेत मंदिरातील पवित्र मार्कंडा तलावात मासे पकडले जातात आणि देवीला अर्पण केले जातात. सकाळी आधी बळी दिलेल्या बकऱ्याचे मटण शिजवून देवीला अर्पण केले जाते. हे दोन्ही पदार्थ बळीची प्रक्रिया पाहणाऱ्यांना प्रसाद म्हणून वाटले जातात. भगवान जगन्नाथ यांचे दरवाजे उघडलेले नसतात तेव्हा हे केले जाते.

*** टारकुलहा देवी मंदिर, उत्तर प्रदेश**

उत्तर प्रदेशातील गोरखपूरमधील टारकुलगा देवी मंदिरात दरवर्षी खिचडी मेळा भरतो. हे मंदिर लोकांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आहे. देशभरातील लोक चैत्र नवरात्रीत येथे येतात. नवस म्हणून देवीला बकऱ्याचा बळी देतात. याचे मांस मातीच्या भांड्यात शिजवले जाते. आणि भक्तांना प्रसाद म्हणून वाटले जाते.

*** पारसिनिक कडवु मंदिर, केरळ**

पारसिनिक कडवु मंदिर भगवान मुथप्पन यांना समर्पित आहे. भगवान मुथप्पन हे कलियुगात जन्मले असून, ते विष्णू आणि शिवाचा अवतार मानले जातात. दक्षिण भारतात त्यांना अनेक नावांनी ओळखले जाते आणि त्यांची पूजा केली जाते. येथे प्रसादात भाजलेली मासळी आणि ताडी भगवान मुथप्पन यांना अर्पण केली जाते. असे केल्याने मनोकामना पूर्ण होते, अशी श्रद्धा आहे. हा प्रसाद नंतर भक्तांना दिला जातो.

***कालीघाट, पश्चिम बंगाल**

हा देशातील ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे आणि २०० वर्षे जुने देवस्थान आहे. येथे बहुतांश भक्त देवी कालीला प्रसन्न करण्यासाठी बकऱ्याचा बळी देता. बळी दिल्यानंतर हे मांस शिजवले जाते आणि भक्तांना प्रसाद म्हणून दिले जाते.



*** कामाख्या मंदिर, आसाम**

कामाख्या मंदिर प्रसिद्ध आहे. ते एक प्रसिद्ध शक्तीपीठांपैकी एक आहे. येथे माँ कामाख्या देवीची पूजा तांत्रिक शक्तींसाठी केली जाती. हे मंदिर आसामच्या नीलाचल पर्वतात आहे. नैसर्गिकदृष्ट्या सुंदर प्रांतात आहे. येथे देवीला दोन प्रकारचा नैवेद्य दिला जातो. एक शाकाहारी आणि दुसरा मांसाहारी. हे दोन्ही नैवेद्य विना कांदा-लसूण बनवले जातात. मांसाहारी प्रसादात बकऱ्याचे मटण असते. ज्यास देवीला अर्पण करून नंतर प्रसाद वाटला जातो. कधी माशाची चटणी तयार केली जाते. हा नैवेद्य दुपारी १ ते २ या दरम्याने देवीला चढवला जातो. या वेळी मंदिराचे मुख्यद्वार बंद असते.

*** तारापीठ, पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालच्या बीरभूम जिल्ह्यातील तारापीठ मंदिर दुर्गा भक्तांमध्ये खूपच प्रसिद्ध आहे. येथेही लोक देवीला मांसाचा नैवेद्य अर्पण करतात. या वेळी देवीला मद्य देखील चढवले जाते. नंतर हा प्रसाद म्हणून लोकांना वाटला जातो.

*** दक्षिणेश्वर काली मंदिर, पश्चिम बंगाल**

दक्षिणेश्वर काली मंदिर हे पश्चिम बंगाल येथील एक प्रसिद्ध शक्तिपीठ आहे. या मंदिरात देवीला नैवेद्यात मासळी दिली जाते. नंतर पूजा झाल्यानंतर ही भक्तात वाटली जाते; मात्र या मंदिरात कोणत्याही प्राण्याची बळी दिला जात नाही.

# पायांमुळे होते लाखोंची कमाई

कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नाही. आजच्या जगात कोणाला दोन वेळचं अन्न मिळत नाही तर कोणी अचानक मालामाल होऊन जातो. आता पायात घातलेल्या, दुर्गंधी येणाऱ्या मोज्यांचं आणि बुटांना कोणी विचारेल तरी का? पण एक मुलगी असे दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे ऑनलाईन विकते आहे. रोक्सी साईक्स असं या महिलेचं नाव आहे. दुर्गंधी येणारे मोजे आणि बूट विकून ती वर्षाला एक लाख पाउंड म्हणजे ७३ लाख रूपये कमावते. एका इंस्टाग्राम पेजवरून या अनोख्या व्यवसायाची सुरूवात झाली. दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे विकायचा विचार कोणाच्याही मनात येणार नाही. पण रोक्सीला ही कल्पना सुचली. सुंदर पायांमुळे ती हे करू शकली. रोक्सीने इन्स्टाग्राम अकांउट सुरू केलं. पायांवर प्रेम करणारे किती लोक आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. एका महिन्याच्या आत तिला दहा हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळाले. मग काही व्यापाऱ्यांनी तिच्याशी संपर्क केला. मोज्यांच्या एका जोडीसाठी २० पाउंड आणि बुटांच्या जोडीसाठी २०० पाउंड देण्याचं ठरलं आणि रोक्सीला मार्ग मिळाला. तिचा व्यवसाय वाढत गेला. रोक्सी महिन्याला ८००० पाउंड कमावते. भारतीय चलनात याचं मूल्य साडेसात लाख रूपये होतं. पायांच्या माध्यमातून कमाईचे मार्ग मिळवण्याचे धडे रोक्सी काही मॉडेल्सना देते आहे. रोक्सीला आता आपल्या भविष्याची अजिबात चिंता नाही.





# जंगल श्वास घेतंय!

झाडं सजीव असतात. तीही श्वास घेतात, ऑक्सिजन बाहेर सोडतात. कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेतात. पण या प्रक्रियेत झाडं श्वासोच्छवास करताना दिसत नाहीत. पण कॅनडामधल्या सेक्रे कोइर भागतलं जंगल अचानक श्वास घेऊ लागलं. झाडंझुडुपं हलू लागली. हे सगळं एका व्हिडिओमध्ये रेकॉर्ड झालं. हा व्हिडिओ व्हायरल झाला. जंगलाला अशा प्रकारे श्वास घेताना बघून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. या व्हिडिओमध्ये जंगलाखालची जमीन हलत असल्याचं दिसून येत आहे. यामुळे झाडं श्वास घेत असल्याचा भास आपल्याला होतो. आता प्रत्यक्षात जंगल अशा प्रकारे श्वास घेऊ शकतं का? तर नाही. मग काय घडलं असावं? हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शास्त्रज्ञांची टीम या ठिकाणी रवाना झाली. त्यांनी शोध घेतला. त्यांच्या असं लक्षात आलं की सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होत आहे. सोसाट्याचा वारा सुटल्यानंतर झाडाचा वरचा भाग हलू लागला. सोसाट्याचा वारा सुटल्यावर पृथ्वीवरची माती नरम पडते. झाडांची मुळं मातीशी घट्ट जोडलेली असतात. पण वाऱ्यामुळे माती नरम पडल्यामुळे मुळं थोडी कमकुवत होतात. वारा सुटल्यानंतर खोड, बुंदे, फांद्या, पानं सगळं जोरात हलू लागतं. त्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होतो, असा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे. सोशल मिडियावर कोणता व्हिडिओ व्हायरल होईल याचा नेम नसतो. पण जंगल श्वास घेत असल्याच्या या व्हिडिओने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला.




# ...मग होतो 'डिजिटल ब्लॅकाऊट'!

बेळगाव जिल्ह्यातील हलगा गावाने डिजिटल युगात एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. दररोज संध्याकाळी ठीक सात वाजता ग्राम पंचायत कार्यालयातून सायरन वाजतो आणि संपूर्ण गाव दोन तासांसाठी 'डिजिटल ब्लॅकआउट'मध्ये बुडते. टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप, टॅब्लेट सर्व स्क्रीन्स बंद होतात. रात्री नऊ वाजता दुसरा सायरन वाजतो आणि जीवन पुन्हा सामान्य होते.

ही मोहीम विशेषतः मुलांच्या शिक्षणासाठी आहे.'एसएसएलसी' परीक्षा आणि अभ्यासाच्या तयारीत मुले मोबाईल-टीव्हीच्या व्यसनामुळे विचलित होतात. आता हे दोन तास मुले पूर्ण एकाग्रतेने अभ्यास करतात. काही मुले ग्रुप स्टडी करतात, तर काही घरातील कामात मदत करतात. पालकही मुलांना साथ देतात. स्वतःही स्क्रीनपासून दूर राहतात.

गावातील महिलाही उत्साहाने सहभागी होताक. पूर्वी संध्याकाळी टीव्ही मालिका पाहण्यात वेळ जात होता. आता त्या कुटुंबाशी बोलतात, घरात गप्पा मारतात किंवा इतर कामे करतात. स्थानिक रहिवासी रोहित यल्लुरकर म्हणतात, या दोन तासांमुळे मुलांची एकाग्रता वाढली आहे. अभ्यासात खूप फरक पडतो आहे. ही कल्पना महाराष्ट्रातील मोहित्यांचे वडगाव गावातील यशस्वी मोहिमेपासून प्रेरित आहे. तिथेही असाच सायरन आणि डिजिटल बंदीचा नियम आहे. हलग्यातील ग्रामस्थांनी हे पाऊल उचलून मुलांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा निर्धार केला आहे.

जास्त स्क्रीन टाइम मुलांसाठी धोकादायक आहे. शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा उपक्रम गरजेचा होता. गावकऱ्यांचा हा स्वेच्छेचा निर्णय पूर्ण गावाने अवलंबला आहे. आता संध्याकाळी गावात शांतता आणि अभ्यासाचे वातावरण असते. कुटुंबे एकत्र येतात, गप्पा मारतात. हा उपक्रम इतर गावांना आणि शहरांना प्रेरणा देत आहे. डिजिटल व्यसनावर मात करण्याचा हा सोपा पण प्रभावी मार्ग खरोखरच कौतुकास्पद आहे.

# घरात चूलच नाही?

शेकडो सालापासून भारतीय गावे त्यांच्या साधेपणासाठी आणि परंपरासाठी ओळखले जातात,परंतु आताकाळ बदलत आहे. सोयी-सुविधा वाढल्या आहेत. आजही काही गावांमध्ये अनोख्या परंपरा सर्वांचे लक्ष आकर्षित करतात. असे एक गाव गुजरातमध्येही आहे. या गावातील कोणत्याही घरात चूल नाही, तरी सर्वजण एकत्र बसून जेवतात आणि कोणीही उपाशी राहत नाहीत.

या गावाचे नाव चंदंकी असे आहे. सुमारे १००० लोकसंख्येच्या या गावात सामुदायिक स्वयंपाकघराची अनोखी परंपरा चालत आली आहे. या संपूर्ण गावात जेवण रोज एकाच जागी तयार केले जाते. सर्व गावकरी एकत्र येऊन जेवतात. ही व्यवस्था केवळ जेवणापर्यंत मर्यादित नाही. तर गावच्या एकता आणि सामाजिक सद्भावाचे एक प्रतिक आहे. गावातील एका ज्येष्ठ व्यक्तीच्या मते, अनेक वर्षांपूर्वी गावातील तरुण नोकरी आणि पोटापाण्याच्या निमित्ताने शहरात आणि परदेशात जाऊन राहू लागलेतेव्हा गावातील म्हाताऱ्या लोकांची संख्या वाढली. यामुळे एकत्र येऊन जेवण तयार करणे आणि एकत्र पंगतीला बसणे सुरू झाले. बऱ्याच काळानंतर ही परंपरा कायम सुरूच ठेवण्यात आली आहे. आज ही या गावाची ओळख बनली आहे.

गावतले सुमारे १०० नागरिक रोज जेवण शिजवण्याची जबाबदारी वाटून घेतात. त्यामुळे कोणावर ओझे पडत नाही. डाळ, भाज्या, पोळ्या सर्वजण एकत्र येऊन तयार करतात. तसेच सणासुदीला आणि खास निमित्ताने वेगवेगळी पक्वानेदेखील तयार केली जातात. येथे कोणी एकटे नाही. चंदंकीचे सामूहिक किचन आता पर्यटकांसाठीदेखील एक आकर्षणाचे केंद्र बनले आहे. येथे येणारे पाहुणे केवळ जेवणाचाच नव्हे तर गावातील संस्कृती, एकता आणि एकजुटीचाही अनुभव घेतात. चंदंकी गावातील लोकांच्या मते, येथे कोणी एकटे नाही. एकमेकांच्या सुख आणि दु:खात साथ देण्याची परंपरा पाळत या संपूर्ण गावाने गावालाच एका कुटुंबात बांधले आहे.



# पकडून लावले लग्न!

बिहारमधील भागलपूर जिल्ह्यात एका जोडप्याला चोरून-लपून भेटताना गावकऱ्यांनी पकडले आणि त्यांना लग्न करण्यास भाग पाडले. हे जोडपे गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि प्रेयसीने प्रियकराला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना या भेटीची कल्पना आली. त्यांनी दोघांना एकत्र असताना पकडले आणि नंतर त्यांचे लग्न लावले.

ही घटना कहलगाव पोलिस ठाणे परिसरातील शिवनारायणपूर अंतर्गत येणाऱ्या ज्योतिपूर गावात घडली. मुलीने मुलाला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना त्यांच्या भेटीची माहिती मिळाली. त्यांनी त्यांना एकत्र पकडले आणि नंतर त्यांना एका खोलीत बंद केले. गर्दी जमली आणि परिस्थिती आणखी बिकट झाली. अखेर गावकऱ्यांनी जोडप्याचे हिंदू रितीरिवाजांनुसार लग्न लावून दिले. लग्नापूर्वीमुलगा, मुलगी आणि दोन्ही बाजूंच्या कुटुंबातील सदस्यांना आमंत्रित करण्यात आले होते. नंतर लग्न समारंभपूर्वक पार पडले. मुलगा सुरुवातीला लग्न करण्यास नाखूष होता परंतु सार्वजनिक दबावानंतर त्याने होकार दिला. नंतर त्याच रात्रीदोघांचे मंदिरात लग्न लावण्यात आले. प्रियकर राजीव कुमारने सांगितले, तो आणि पूजा गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते. कॉलेजला जाताना त्यांची भेट झाली होती.



# एकच गर्भ वाढला दोन गर्भाशयांत

देवकीने कृष्णाला जन्म दिला. पण यशोदेने त्याला आईचं प्रेम दिलं. त्यामुळे भारतात देवकी आणि यशोदा ही संकल्पना आहे. एका आईने पोटात वाढवलेल्या बाळाला दुसरी आई यशोदा बनून प्रेम देते. पण अमेरिकेत विज्ञानाच्या मदतीने चमत्कार घडला आहे. इथे दोन आयांनी एकच गर्भ आपल्या पोटात वाढवला आणि बाळाला जन्म दिला. हे इथल्या समलैंगिक जोडप्याचं बाळ आहे. दोन महिलांच्या गर्भात वाढलेलं हे जगातलं पहिलंच बाळ आहे. त्यामुळे ही घटना ऐतिहासिक मानली जात आहे. आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या मदतीने या जोडप्याने बाळाला जन्म दिला. कल्पनातीत वाटणारी ही घटना प्रत्यक्षात आणण्यासाठी अमेरिकेतल्या डॉक्टरांनी खूप मेहनत घेतली. या जोडप्यातल्या एका महिलेच्या अंडाणूंचं शूक्राणूदात्याच्या शूक्राणूंसोबत प्रयोगशाळेत मिलन घडवण्यात आलं. यानंतर हे भ्रूण या जोडप्यातल्या एका महिलेच्या गर्भात सोडण्यात आलं. काही काळानंतर हे भ्रूण दुसऱ्या महिलेल्या गर्भात सोडण्यात आलं. त्यानंतर या महिलेने बाळाला जन्म दिला. ॲश्ले आणि ब्लिस कॉल्टर असं या पालक जोडप्याचं नाव आहे. २०१५ मध्ये त्या दोघी विवाहबद्ध झाल्या. या दोन्ही महिलांना स्वत:चं पोटचं बाळ हवं होतं. पण समलैंगिक असल्याने ते शक्य नव्हतं. त्यामुळे त्यांनी आयव्हीएफ तंत्रज्ञानाची मदत घेतली. ३६ वर्षांच्या ब्लिसने आपले अंडाणू दिले. शूक्राणूंसोबत फलन झाल्यानंतर गर्भ ब्लिसच्या गर्भात सोडण्यात आला. काही काळानंतर २८ वर्षांच्या ॲश्लेच्या गर्भात हेच भ्रूण सोडण्यात आलं. या वर्षी जून महिन्यात त्यांनी मुलाला जन्म दिला. स्टेटसन असं या मुलाचं नाव आहे. या प्रक्रियेसाठी ८५०० डॉलर्स गइतका खर्च आला. तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे या दोन्ही महिलांना पोटात बाळ वाढवण्याचं सुख मिळालं.



## क्षुल्लक कारणावरुन
# शेजाऱ्याचा खून

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

गेल्या काही दिवसांपासून हत्याकांडाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून गुन्हेगारांच्या आक्रमकतेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. इमामवाडा पोलिस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर तीन गुन्हेगारांनी एका व्यक्तीचा क्षुल्लक कारणावरुन खून केला. ही घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. मंगल मांगीया कोरी (५०) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगल कोरीच्या खून प्रकरणात इमामवाडा पोलिसांनी रोहन कमलाकर चावरीया (३४) त्याचा लहान भाऊ रोहित कमलाकर चावरीया (३२) आणि कुंदन देविदास चव्हाण (४९) या तीन आरोपींना रविवारी पहाटेच्या सुमारास अटक केली.

**तीनही आरोपींना अटक**

इमामवाडा पोलिसांनी रोहन आणि रोहित चावरीया भावंडासह कुंदन चव्हाण या तीनही आरोपींविरुद्ध हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेचे पथक आणि इमामवाडा पोलिसांनी आरोपींची लगेच शोध मोहिम सुरु केली. तीनही आरोपींना पहाटे विविध ठिकाणांवरुन अटक केली. आरोपींपैकी रोहन चावरिया आणि कुंदन चव्हाण विरोधात यापूर्वी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

माहितीनुसार, चावरीया भावंडांची इमामवाडा-जाततरोडी परीसरात चांगली दहशत आहे. गुन्हेगार चावरीया भावंड सामान्य नागरिकांना त्रस्त करीत दबदबा कायम ठेवतात. इमामवाडा पोलिस ठाण्याच्या मागच्या गल्लीत राहणारे मंगल कोरी आणि चावरीया भावंडांमध्ये क्षुल्लक कारणावरून गेल्या काही दिवसांपासून वाद सुरु होता. शनिवारी रात्री मद्य प्राशन करून आलेल्या रोहन चावरीयाने घराबाहेर उभ्या असलेल्या मंगल कोरी यांना शिविगाळ सुरू केली. त्याचा आवाज एकून मंगलचा मुलगा शुभमने आक्षेप घेतला. त्याच वेळी रोहनचा भाऊ रोहित चावरिया आणि मित्र कुंदन चव्हाण या तिघांनी मंगल कोरीया यांना मारहाण सुरू केली.

रोहनने लाकडी दांड्याने मंगल यांच्यावर हल्ला केला. मंगलच्या डोक्यावर दंड्याचा मार बसल्यामुळे तो गंभीर जखमी झाले. मंगल रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले. मंगल मृत पावल्याचे बघून आरोपींनी तेथून पळ काढला.कुटुंबियांनी मंगल यांना मेडिकल रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या हत्याकांडाबाबतत इमामवाड्याचे ठाणेदार जयवंत पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी कामात व्यस्त असल्याची प्रतिक्रिया दिली.

# भाजपच्या कार्यकाळात नागपूरचा कायापालट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

महापालिका निवडणुकीसाठी नुकताच कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यातून ३० हजार लिटर मोफत पाणी, मोफत बस सेवेचे आश्वासन दिले. आज भाजपने महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यातून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मनपा बसमधून मोफत बसप्रवासाचा अपवाद वगळला तर मोफत योजनांना बगल दिली आहे. भाजपने जाहिरनाम्यातून जुन्याच योजनांना पुढे घेऊन जाण्यासोबत नागपुरात विदेशी दूतावास, मेट्रो टप्पा तीनचा संकल्प केला असून यातून नागपूरकरांसाठी सर्वोत्तम क्रमांक एकच्या शहराची उभारणी करण्याची ग्वाही दिली. कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यातील ५०० वर्गफूट घरांना मालमत्ता करापासून मुक्त करण्याची घोषणा भाजपनेही त्यांच्या जाहिरन्यातून केली आहे.

महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शहर भाजपाध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके, आमदार परिणय फुके, माजी आमदार प्रा. अनिल सोले, सुधाकर कोहळे, गिरीश व्यास, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, निवडणूक प्रमुख संजय भेंडे, माजी महापौर नंदा जिचकार, भाजप नेते जयप्रकाश गुप्ता यांच्या उपस्थितीत रामदासपेठेतील हॉटेल तुली इम्पेरिअलमध्ये जाहिरनामा प्रकाशित करण्यात आला.

भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी जाहिरनाम्यातील वैशिष्ट सांगताना म्हणाले, महापालिकेतील भाजपच्या २० वर्षांच्या काळात शहरात अनेक कामे झाली. २०१७ मध्ये जे वचन भाजपने दिले. ती सर्व पूर्ण करण्यात यश आले. परंतु २४ बाय ७ योजनेंतर्गत संपूर्ण शहरात २४ तास पाणीपुरवठा करण्यात अद्यापही यश आले नाही. पुढील काळात संपूर्ण शहरात २४ तास पाणी देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शहराचा कायापलट करण्याचे काम भाजपने खऱ्या अर्थाने सुरू केल्याचा दावा करीत त्यांनी सुरुवातील गेल्या काळात केलेल्या कामाचा पाढा वाचला. ६० हजार झोपडपट्टीवासींना पट्टे वाटप, मलजल निःस्सारण योजनेच्या कामांना गती, पाकिस्तानातील सिंध प्रांतातून आलेल्या सिंधी बांधवांना मालकी पट्टे, जलकुंभाची बांधणी, तलावांचे संवर्धन व सौंदर्यीकरण, उद्यान, मैदानाचा विकास, सिमेंट रस्ते, कचऱ्यावर प्रक्रिया आदी मागील काळात केलेल्या योजनांची माहिती त्यांनी दिली.

येत्या काळात संपूर्ण शहर लिजमुक्त करण्याची ग्वाही तिवारी यांनी जाहिरनाम्यातून दिली. नासुप्रच्या ले-आऊटमध्ये नागरिकांना ग्राऊंड रेंटसह मालमत्ता करही भरावा लागतो. संपूर्ण शहर लिजमुक्त केल्यानंतर या नागरिकांवरील ग्राऊंड रेंटचा भुर्दंड बसणार नाही. येत्या काळात नाग नदी पुनरुज्जीवनाच्या कामांना गती, पोहरा नदी पुनरुज्जीवनासाठी नवीन सिवेज लाईनची कामे सुरू करण्याची ग्वाहीही देण्यात आली.



महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा जाहिरनामा प्रसिद्ध

# पेट्रोल टाकून दाम्पत्याला जाळण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ११ :

लाखनी तालुक्यातील पोहरा येथे रस्ता अडवून उभ्या असलेल्या तरुणांना दुचाकी बाजूला करण्यास सांगणे एका दाम्पत्याला चांगलेच महागात पडले. या क्षुल्लक कारणावरून संतापलेल्या दोन सराईत गुन्हेगारांनी पती-पत्नीसह त्यांच्या पुतण्यावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा धक्कादायक प्रयत्न केला. याप्रकरणी लाखनी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली.

पोहरा येथील रहिवासी विरांगणा विलास मेश्राम आणि त्यांचे पती पायी जात असताना ही घटना घडली. पोहरा परिसरात धम्मराज नेमीचंद मेश्राम (३२) आणि भीमराज नेमीचंद मेश्राम (२९) दोन्ही रा. सेलोटी यांनी दुचाकी रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. मेश्राम यांनी त्यांना गाडी बाजूला घेण्याची विनंती केली असता, आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आम्ही नुकतेच कारागृहातून बाहेर आलो आहोत, आमचे कोणी काही वाकडे करू शकत नाही, अशी धमकी देत आरोपींनी स्वतःजवळील बाटलीतील पेट्रोल दांपत्याच्या अंगावर ओतले.

आरोपींनी एवढ्यावरच न थांबता दांपत्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि आगपेटी काढून त्यांना पेटवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पती-पत्नीला वाचवण्यासाठी आलेला त्यांचा पुतण्या याच्यावरही आरोपींनी पेट्रोल ओतून त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे लाखनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# सरकारी निधीतून निवडणूक जिंकण्याचा भाजपचा फंडा

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ११ :

सरकारी निधीचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा भाजपचा फंडा आहे. महागाई वाढवून लाडक्या बहिणींच्या बटव्यातून पाच हजार काढत शासकीय तिजोरीतून त्यांच्या खात्यात दीड हजार टाकले जातात. हे भाजपचे पाप आहे, अशी टीका कॉंग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी आज येथे केली.



अकोला महापालिका निवडणुकीतील कॉंग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ ते आज आले होते. माध्यमांशी संवाद साधतांना विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर निशाणा साधला. लाडकी बहीण योजनेला कॉंग्रेसचा विरोध असल्याच्या भाजपच्या टीकेला त्यांनी प्रत्युत्तर दिले. विजय वडेट्टीवार म्हणाले, ह्यसत्ताधारी एका दिवसातून लाडक्या बहिणींचे पाच हजार रुपये लुटून नेत आहेत. ५० रुपये किलोचे तेल १५० रुपये केले. ४० रुपये किलो मिळणारी दाळ आता १२० रुपये झाली. गृहिणींचे संपूर्ण बजेटच कोलमडून टाकण्याचे पाप भाजप करीत आहे. सरकारी तिजोरीतून दीड हजार रुपये वाटून लूट करण्याचे काम केले जात असून त्याला लाडकी बहीण हे नाव देण्यात आले. लाडकी बहीण आता भुलणार नाही. महागाई वाढवून सत्ताधारी त्यांची लूट करतात, हे आता लपून राहिलेले नाही.

आमच्या एका उमेदवाराने असे म्हटले की १४ तारखेला तुम्ही पैसे का टाकताय? १५ ला मतदान आहे. सरकारी निधीचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा भाजपचा फंडा आहे. पैसेच टाकायचे होते, तर ते अगोदर टाकायला पाहिजे किंवा नंतर करायला पाहिजे. निवडणुकीच्या तोंडावर हे करणे म्हणजे त्याचा निवडणुकीवर परिणाम होईल. आम्ही त्याला विरोध केलेला नाही. शब्द फिरवण्यात भाजप हुशार आहे. जनतेला सर्व माहिती आहे, अशा शब्दात विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीका केली. यावेळी कॉंग्रेस नेते प्रकाश तायडे, प्रदीप वखारिया, महानगराध्यक्ष प्रशांत वानखडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रावर १० लाख कोटींचे कर्ज उभे केले. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री केवळ स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी करत राज्याची तिजोरी लुटत आहेत. निवडणुका आल्या की वेगळे लढतात. अजित पवारांना केवळ कॉंग्रेसची मते खाण्यासाठी बाजूला ठेवले. जे जातीय आणि धर्मांध शक्तींसोबत जाऊन बसतात, ते धर्मनिरपेक्ष कसे असू शकतात? ७० वर्षांत कॉंग्रेसनेच देश उभा केला. आयत्या बिळावर नागोबा सारखे हे लोक येऊन बसले आहेत, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

# ट्रक व कारच्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू





■ महासागर प्रतिनिधी, चांदूर रेल्वे, दि. ११ :

चांदूर रेल्वेपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर चांदूर रेल्वे-अमरावती मार्गावरील बासलापूर नजीक असलेल्या मच्छी तलावाजवळ रविवारी (ता. ११) दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ट्रक व कार यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात कार चालकाचा जागीच मृत्यू झाला.

मृत व्यक्तीचे नाव अमित गजाननराव पांडे (वय ४५, रा. अमरावती) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार अमित पांडे हे आपल्या चारचाकी वाहनाने (कार क्र. MH ०४ E ९९९४) चांदूर रेल्वेकडून अमरावतीकडे जात होते. यावेळी समोरून येणाऱ्या ट्रक (क्र. MH 27 B ९४९८) व कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की कार पूर्णपणे चकनाचूर झाली आणि चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. जेसीबीच्या मदतीने रस्त्यावर अडथळा ठरलेली कार बाजूला करण्यात आली. तसेच कारमध्ये अडकलेला मृतदेह बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिकांनी पोलिसांना मदत केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी स्थानिक ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस कर्मचारी जगदीश राठोड व अतुल शिरसाट यांनी उपस्थित राहून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# चना पोहा विथ गडकरी विशेष संवादात्मक कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या नागपूर शहराच्या वतीने चना पोहा विथ गडकरी नावाचा एक विशेष संवादात्मक कार्यक्रम आयोजित केला आहे. सोमवार १२ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता एनआयटी बगीचा सक्करदरा येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागरिकांशी संवाद साधतील. या कार्यक्रमात सध्या देशभरातील तरुणाईची क्रश म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री गिरिजा नितीन गडकरींची मुलाखत घेणार आहे. नागपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन दृष्टिकोन सादर करण्याच्या उद्देशाने चना पोहा विथ गडकरी नावाचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देवाभाऊ विथ तर्री पोहा कार्यक्रम यापूर्वीच घेण्यात आला होता.

# ॲडव्हांटेज विदर्भमुळे विदर्भाच्या क्षमता कळल्या

## ॲडव्हान्टेज विदर्भच्या कार्यालयाचे उद्घाटन व भूमिपूजन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटतर्फे मागील दोन वर्षांपासून आयोजित होत असलेल्या ॲडव्हान्टेज विदर्भमुळे विदर्भाच्या औद्योगिक क्षमता समोर आला असून त्यामुळे विकासाची प्रक्रिया गतीने सुरू झाली आहे, असे गौरवोद्गार गोयल गंगा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अतुल गोयल यांनी काढले.

तीन दिवसीय ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ - खासदार औद्योगिक महोत्सव येत्या, ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या आयोजित करण्यात येणार असून या उपक्रमाची सुरुवात रविवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरी रोड, येथे भूमिपूजन समारंभ व कार्यालय उद्घाटनाने झाली. यावेळी ॲडव्हांटेज विदर्भच्या वेबसाईटचे देखील विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



सुरुवातीला गोयल स्टीलचे चेअरमन अशोक गोयल व पौर्णिमा गोयल यांच्य हस्ते विधीवत पूजन झाल्यानंतर डॉ. अतुल गोयल यांनी कुदळ मारून व नारळ फोडून भूमिपूजन केले. यावेळी आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे, सचिव डॉ. विजयकुमार शर्मा, कार्यकारी सदस्य राजेश रोकडे, विनोद तांबी, डॉ. महेंद्र क्षिरसागर, चैतन्य देशपांडे, शिवा राव यांची मंचावर उपस्थिती होती.

नागपूर व परिसरात मोठ्या प्रमाणात टॅलेंट असून ते बाहेर जाण्याऐवजी येथेच कसे थांबवता येईल, यावर अभ्यास व संशोधन करण्याची गरज असल्याचे डॉ. अतुल गोयल यांनी नमूद केले.

## प्रेयसीच्या भावावर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

वर्षभरापासून प्रेमसंबंध असतानाही प्रेयसीच्या जीवनात दुसरा युवक आला. त्यामुळे तिने पहिल्या प्रियकरापासून दुरावा निर्माण करुन मित्रासोबत फिरणे सुरु केले. त्यामुळे चिडलेल्या प्रियकराने प्रेयसीवर हल्ला केला. तसेच तिला वाचविण्यासाठी समोर आलेल्या तिच्या भावावरही कोयत्याने वार करुन जखमी केले. ही घटना यशोधरानगर भागातील पिवळी नदी परिसरात उघडकीस आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावीत शिकणाऱ्या १५ वर्षीय मुलीची वर्षभरापूर्वी कुणाल सलामे या युवकाशी मैत्री झाली. त्याचे रुपांतर प्रेमात झाले. गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंध दोघांमध्ये होते. मात्र, तिच्या जीवनात आणखी एक युवक आला. त्यानेही तिच्याशी मैत्री आणि प्रेमसंबंध ठेवले. दुसऱ्या प्रियकरामुळे ती कुणालला टाळत होती. मात्र, कुणाल तिला बळजबरी भेटत होता. ही बाब घरच्यांच्या माहिती झाल्याने वडिलांनी मुलीला व कुणालला समजावून सांगितले.

# १८ हजार वृक्षतोडीच्या मोबदल्यात मिळणार ३२ कायमस्वरूपी नोकऱ्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

चंद्रपूर जिल्ह्यात दरवर्षी सरासरी ५० निष्पाप नागरिक वाघांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडत असताना, हा संघर्ष कमी करण्याऐवजी राज्य सरकार लोहारडोंगरी येथील लोहखनिज खाणीला परवानगी देऊन परिस्थिती अधिक गंभीर करण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याची तीव्र टीका इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष आणि राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे माजी सदस्य बंडू धोतरे यांनी केली आहे.

केवळ ३२ कायमस्वरूपी नोकऱ्यांचे आमिष दाखवून सुमारे १८ हजार पूर्ण वाढलेली झाडे तोडण्याचा आणि वाघांचे नैसर्गिक भ्रमणमार्ग बंद करण्याचा हा प्रयत्न असल्याचे धोतरे म्हणाले. या निर्णयामुळे ताडोबा आणि ब्रह्मपुरी परिसरातील वाघांचे स्थलांतर रोखले जाईल आणि परिणामी वाघ-मानव संघर्ष आणखी तीव्र होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ताडोबा जंगलापासून लोहारडोंगरी वनक्षेत्रापर्यंत वाघांचे उत्तर व पूर्व दिशेने होणारे नैसर्गिक स्थलांतर हा संपूर्ण व्याघ्र अधिवासासाठी अत्यंत महत्त्वाचा कॉरिडॉर आहे. या मार्गात खाण सुरू झाल्यास ताडोबा-ब्रह्मपुरी पट्ट्यातील जैविक संतुलन बिघडण्याची भीती आहे. वनविभागाकडून संघर्ष कमी करण्यासाठी होणारा खर्च आणि शासनाकडून दिली जाणारी नुकसानभरपाई ही खाणीच्या कथित आर्थिक फायद्यापेक्षा अधिक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

राज्य सरकारने नेमलेल्या त्रिसदस्यीय तज्ज्ञ समितीने हा प्रकल्प स्पष्टपणे नाकारल्याचे दाखवले असले तरीही त्यात पळवाटांना जागा ठेवली., त्यातून होणारे नुकसान हे फायद्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त असल्याचे नमूद केले आहे. २०२१ मध्ये स्थापन केलेल्या चंद्रपूर जिल्हा वाघ-मानव संघर्ष राज्यस्तरीय तांत्रिक अभ्यास समितीचा अहवाल सरकारने स्वीकारलेला असतानाही, त्याच्या शिफारशींकडे दुर्लक्ष करून व्याघ्र अधिवासात खाणीस परवानगी देणे ही चिंताजनक बाब असल्याचे धोतरे यांनी सांगितले.

# एक चुकीचे मत तर शहर विकासापासून दूर

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ११ :

महापालिकेची निवडणूक शहर विकासाच्या मुद्द्यावर लढली जात आहे. भाजपकडे विकासाचा आराखडा तयार आहे. मतदारांचे एक चुकीचे मत शहराला विकासापासून दूर ठेऊ शकतो, असे मत महसूल मंत्री तथा भाजपाचे प्रदेश निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

अकोला महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुने शहर व शिवाजी पार्क येथे झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आ. वसंत खंडेलवाल विजय अग्रवाल, बळीराम सिरस्कार यांच्यासह भाजप पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते.

हिंदुत्ववादी मतांचे विभाजन टाळण्याचे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी करून विरोधकांवर निशाणा साधला. पुढे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काही जण केवळ मतांचे दान मागून पळणारे असतात. भाजपने सदैव जनहित लक्षात घेतले आहे. अकोला जिल्ह्यातील मालमत्तांची नकाशासह संपूर्ण माहिती त्यांच्या मोबाइलवर देण्याची तयारी सरकारने केली आहे. महायुती सरकारच्या कार्यकाळात लाडकी बहीण योजना बंद होणार नसून लखपती दिदी योजनेच्या माध्यमातून मातृशक्तीला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले जाणार आहे.



## चंद्रशेखर बावनकुळे यांचा सावधगिरीचा इशारा

अकोल्याचा विकास कसा घडेल, याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. विकास आराखडा तयार आहे.

१२६ विकास योजनांची प्रभावी अंमलजबजावणी केली जाणार आहे. रस्ते, वीज, पाणी यासारख्या मूलभूत योजना सोडवण्यासह उड्डाणपूल, श्री राजराजेश्वर मंदिर विकास, भूमिगत गटार योजना, शहर बससेवा आदी मार्गी लावण्यात येतील, असे बावनकुळे यांनी सांगितले.

श्री राजराजेश्वर मंदिरावर असामाजिक तत्त्वांनी हल्ला केला होता. या शहरांमध्ये धुमाकूळ घालण्याचा प्रयत्न केला होता. राज्य सरकारने कायदा व सुव्यवस्था योग्य पद्धतीने हाताळून संरक्षणाचे कार्य केले, असे आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले. खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांसह अकोला महापालिकेच्या कार्याची माहिती दिली.

**लाडक्या बहिणींविषयी कॉंग्रेसची द्वेषाची भावना**

राज्यातील लाडक्या बहिणींविषयी कॉंग्रेसमध्ये द्वेषाची भावना ठासून भरली आहे. लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद कॉंग्रेस व त्यांच्या नेत्यांना बघवत नाही. कॉंग्रेसच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेचे पैसे देऊ नका, असे पत्र महाराष्ट्र निवडणूक आयोगाला दिले. कॉंग्रेसचा हा खरा चेहरा आता पुढे आला आहे, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.